cmyk

## संपादकीय

### विरोधकांना नवे बळ तर सत्ताधाऱ्यांची पिछेहाट !

महाराष्ट्र विधानसभेचे पावसाळी अधिवेशन सोमवारपासून सुरू झाले असून पहिल्याच दिवशीच वातावरण तापले. पहिलीपासून हिंदी लागू करण्याच्या त्रिभाषासूत्रातील निर्णयाला सर्व स्तरातील मराठी जनतेच्या तीव्र विरोधामुळे सरकारने अधिवेशनाच्या तोंडावरच मागे घेतले. उद्धव ठाकरे व राज ठाकरे यांच्या एकत्र येऊन आंदोलन करण्याच्या निर्धारामुळे हा विषय खूपच चर्चेत आला आणि सरकारला माघार घ्यावी लागली.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


### पहलगामचा हल्ला आर्थिक हल्ला होता-परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर

न्यूयॉर्क : भारताचे परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्याचे वर्णन आर्थिक हल्ला म्हणून केले आहे. या हल्ल्याचा उद्देश काश्मीरमधील पर्यटनाला हानी पोहोचवण्याचा होता. जरी भारताला अणुहल्ल्याची धमकी दिली गेली तरी पाकिस्तानकडून येणाऱ्या दहशतवादा विरुद्धची कारवाई थांबणार नाही असे जयशंकर यांनी स्पष्ट केले. न्यूयॉर्कमधील न्यूजवीकशी झालेल्या संभाषणात एस. जयशंकर म्हणाले की पहलगाम हल्ला केवळ लोकांना घाबरवण्यासाठी नाही तर काश्मीरच्या उत्पन्नाचा सर्वात मोठा स्रोत असलेल्या पर्यटनाला संपवण्याच्या उद्देशाने करण्यात आला आहे.


बीड - महाराष्ट्र | वर्ष-५ | अंक-६८ | बुधवार, दि.०२ जुलै २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये


# कृषीदिनी शेतकऱ्यांचा लढा पेटला; राज्यभरात शक्तिपीठ महामार्गाविरोधात तीव्र आंदोलन

पुणे। प्रतिनिधी

शक्तिपीठ महामार्गाला शेतकऱ्यांचा प्रखर विरोध सुरूच आहे. शक्तिपीठ महामार्ग प्रकल्पाविरोधात कृषी दिनानिमित्त मंगळवारी (दि.१) शेतकऱ्यांनी राज्यभरात तीव्र आंदोलन केले. कोल्हापूर, सांगली, सोलापूर, धाराशिव, लातूर, बीड, परभणी, नांदेड, हिंगोली, यवतमाळ, वर्धा आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमधील शेतकऱ्यांनी रस्त्यावर उतरून या प्रकल्पाला विरोध केला. ८०२ किलोमीटर लांबीच्या या महामार्गामुळे सुपीक जमिनींचे मोठ्या प्रमाणात अधिग्रहण होणार असून, लाखो शेतकरी भूमिहीन होण्याची भीती आहे, त्यामुळे या आंदोलनाला व्यापक



पाठिंबा मिळत आहे.

कोल्हापुरात सकाळी १० वाजल्यापासून शक्तिपीठ महामार्ग विरोधी कृती समितीच्या नेतृत्वाखाली हजारो शेतकरी एकत्र आले. तर माजी खासदार राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांनी कोल्हापूर-सांगली महामार्गावर चक्का जाम करण्यात आला. पोलिसांनी मात्र शेट्टी यांच्या घरासमोर मोठा बंदोबस्त ठेवून आंदोलन मागे घेण्यासाठी नोटीस बजावली. परंतु, शेट्टी यांनी मात्र सरकारच्या दबावाला न जुमानता आंदोलन सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला. आंदोलनस्थळाकडे जाताना राजू शेट्टी म्हणाले, ''काही कारण नसताना शेतकऱ्यांना रोखले गेले. पोलिसांनीच महामार्ग रोखला, मग शेतकऱ्यांनी आंदोलनस्थळी जायचे तरी कसे? पोलीस जर वाकड्यात जाणार

पान २ वर

### विरोधकांचे विधीमंडळाच्या पायऱ्यावर आंदोलन

मुंबईत पावसाळी अधिवेशनादरम्यान महाविकास आघाडीच्या नेत्यांनी विधिमंडळाच्या पायऱ्यांवर निदर्शने करत शक्तिपीठ रद्दच्या घोषणा दिल्या. विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी विधानसभेत हा मुद्दा उपस्थित करत शेतकऱ्यांच्या हितासाठी प्रकल्प रद्द करण्याची मागणी केली.

### आर्थिक आणि सामाजिक नुकसान

शेतकऱ्यांचा आरोप आहे की, ८६ हजार कोटींचा हा प्रकल्प सुपीक जमिनी नष्ट करेल आणि भूसंपादन कायद्याचे उल्लंघन करेल. सरकारने या प्रकल्पाद्वारे धार्मिक स्थळांना जोडण्याचे आणि पर्यटनाला चालना देण्याचे उद्दिष्ट जाहीर केले आहे. मात्र, शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, यामुळे त्यांचे आर्थिक आणि सामाजिक नुकसान होईल. काही कार्यकर्त्यांनी प्रकल्पाच्या पर्यावरणीय परिणामांवरही प्रश्न उपस्थित केले.

# सरकार शेतकरीविरोधी

## पटोले यांच्या निलंबनावरून विरोधकांची टिका

मुंबई। प्रतिनिधी



राज्य विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी, मंगळवारी (दि.१) काँग्रेस नेते नाना पटोले यांना विधानसभेतून एक दिवसासाठी निलंबित करण्यात आले. भाजप आमदार बबनराव लोणीकर आणि कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी शेतकऱ्यांबाबत केलेल्या वादग्रस्त वक्तव्यावर पटोले यांनी सभागृहात तीव्र संताप व्यक्त केला. तर विरोधकांनी सरकारवर टिका केली.

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड म्हणाले, ''अध्यक्षांच्या आसनापर्यंत जाण्याची ही पहिली वेळ नाही. जे सत्ताधारी आहेत, ते विरोधी पक्षात असताना अनेकदा अध्यक्षांच्या आसनापर्यंत जाऊन गोंधळ घालायचे. त्याच्या तुलनेत नाना पटोले हे एकटे आणि दूर होते. याआधी अध्यक्षांना झुंडीने घेरतानाही पाहिले आहे. जर सत्ताधारी पक्षाने नियोजनपूर्वक पटोलेंना बाहेर काढण्याचा डाव आखला असेल, तर तो आम्हाला मान्य नाही. आज लोकशाहीचे सर्व संकेत पायदळी तुडवले जात आहेत. नाना पटोलेंना जे अधिकार आहेत, ते लोकशाहीने दिले आहेत. त्यांनी आंदोलनाचा मार्ग निवडला असेल,

पान २ वर

## धनंजय मुंडे यांच्या मागणीला २४ तासातच यश

# बीड प्रकरणाचा तपास आता वरिष्ठ महिला आयपीएस अधिकारी करणार; मुख्यमंत्र्यांची विधानसभेत घोषणा

### प्रकरण अतिशय गंभीर, आरोपी आणि त्यांना आश्रय देणारे, कुणालाही सोडणार नाही- फडणवीस

मुंबई। प्रतिनिळपधी

माजी मंत्री आ.धनंजय मुंडे यांनी बीड शहरात घडलेल्या अल्पवयीन मुलीवरील लैंगिक अत्याचार प्रकरणी केलेल्या मागणीला राज्य सरकारने २४ तासातच मान्य केले असून, या संपूर्ण प्रकरणाचा तपास आता एका वरिष्ठ महिला आयपीएस दर्जाच्या अधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखाली विशेष तपास पथक मार्फत केला जाणार असून, याबाबतची अधिकृत घोषणा राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधिमंडळ सभागृहात केली आहे.



बीड येथे घडलेले प्रकरण अतिशय गंभीर व माणुसकीला आणि शिक्षकी पेशाला काळीमा फासणारे आहे. या प्रकरणात अशाच प्रकारे आणखी काही मुलींचे देखील लैंगिक शोषण झाल्याची शंका नाकारता येत नाही, त्यामुळे असे प्रकार घडलेल्या मुलींनी आता स्वतःहून समोर येऊन तक्रार द्यावी, या प्रकरणाचा संपूर्ण छडा लागावा, यातील दोषी व त्यांना मदत करणारे तसेच त्यांना राजकीय किंवा सामाजिक बळ देणारे हे कोण आहेत, ते निष्पन्न व्हावेत व त्यांना कठोर शिक्षा व्हावी, ही सरकारची व नवनियुक्त समितीची भूमिका असेल, दोषी असलेल्या कुणालाही सोडले जाणार नाही, असे स्पष्ट शब्दात देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे. धनंजय मुंडे यांच्या सह आज सभागृहात राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार चेतन तुपे यांनीही आज हा मुद्दा विधानसभेत उपस्थित केला होता. दरम्यान या तपास पथकाला

पान २ वर

# आ.धनंजय मुंडेंच्या खळबळजनक आरोपावर आ.क्षीरसागरांचा पलटवार

## म्हणाले, मी त्यांच्यासारखा १५० दिवस पळून गेलो नाही!

बीड। प्रतिनिधी

धनंजय मुंडे यांच्या आरोपावर संदीप क्षीरसागर यांनी प्रत्युत्तर दिले आहे. संदीप क्षीरसागर म्हणाले की, त्यांची मागणी एसआयटीची आहे, त्याला मी सहमत आहे. जो प्रकार घडला तो चुकीचा घडला आहे. गुन्हा दाखल झाला त्याच्या दुसऱ्या दिवशीच त्या शिक्षकांना अटक झाली आहे. प्रशासनासोबत आम्ही चर्चा करत आहेत. पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज ताब्यात घेतले आहे. ते माझ्या जवळचे असले तरी ॲक्शन घ्यायला मागे पुढे बघू नका, असे मी सांगितले आहे.



या प्रकरणात गुन्हा दाखल करायला १० दिवस लागले नाही. माझ्या जवळचे असले तरी पीडिताने तक्रार देताच गुन्हा दाखल झाला आहे. मी काही त्यांच्यासारखं १५० दिवस पळून गेलो नाही. त्यांचे मंत्रीपद गेल्याने त्यांना दुःख आहे. ते या प्रकरणात बोलत आहेत तसेच मस्साजोग प्रकरणी त्यांनी आक्रमक भूमिका घ्यायला हवी होती. बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा आहेत. त्यांनी त्यांच्यावर विश्वास ठेवायला हवा होता, असे आ. क्षीरसागर यांनी म्हटले आहे. संदीप क्षीरसागर पुढे म्हणाले की, या प्रकरणात पोलीस देखील तत्परतेने कारवाई करत आहेत. मी आता बोलण्यापेक्षा सत्तेत मुंडे साहेब आहेत, त्यांनी जोर लावला पाहिजे. मस्साजोग प्रकरणी मुंडे बोलले की, १५० दिवस बाहेर राहावे लागले, त्यांचे मंत्रीपद गेले, त्यामुळे त्यांना दुःख आहे. मात्र, लोकप्रतिनिधी म्हणून मी रोज रस्त्यावर काम करतो.

पान २ वर

# आम्ही वाट बघतोय...!

## १९ वर्षांनंतर पहिल्यांदाच राज-उद्धव यांचे संयुक्त पत्र

मुंबई। प्रतिनिधी

महाराष्ट्राच्या राजकारणात एक ऐतिहासिक क्षण घडताना दिसत आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि शिवसेना (ठाकरे गट) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे हे दोन ठाकरे बंधू प्रथमच एका संयुक्त निमंत्रणपत्रिकेवर एकत्र झळकले आहेत. खासदार संजय राऊत यांनी हे पत्र मंगळवारी (दि.१) त्यांच्या ट्विटवरून यासंदर्भातील एक पोस्ट शेअर केली आहे.



गुरूवार, ५ जुलै रोजी सकाळी १० वाजता, मुंबईच्या वरळीतील डोम येथे आयोजित 'विजयी जल्लोष मेळावा' या कार्यक्रमासाठी राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी एकत्रितपणे निमंत्रण दिले आहे. हिंदी सक्तीचा निर्णय मागे घेतल्यानंतर महाराष्ट्रभर मराठी भाषिकांमध्ये आनंदाची लाट उसळली असून, या पार्श्वभूमीवर हा मेळावा आयोजित केला जात आहे. या मेळाव्यासाठी मनसे आणि शिवसेना (ठाकरे गट) यांच्या नेत्यांकडून मंगळवारी रात्री ९.३० वाजता डोम येथे पाहणी करण्यात येणार आहे. कार्यक्रमासाठी जय्यत तयारी सुरू आहे. विशेष म्हणजे, राजकीय संघर्षाच्या अनेक वर्षांनंतर ठाकरे बंधू एकाच मंचावर

पान २ वर

# अपघात झाल्यास वारकऱ्याला ४ लाखांची मदत

## महसुल विभागाकडून परिपत्रक जारी

मुंबई । प्रतिनिधी

विठ्ठलाच्या भेटीसाठी पंढरपूरला पायी जाणारे हजारो वारकरी मोठे अंतर कापत पंढरपुरात येतात. राज्य शासनाने वारकऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून वारीदरम्यान कोणत्याही प्रकारच्या अपघातात वारकऱ्यांचा मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबीयांना सरकारकडून ४ लाख रुपयांची आर्थिक मदत दिली जाणार आहे. यासंदर्भातलं नवे परिपत्रक महसूल विभागाने मंगळवारी जाहीर केले.

पान २ वर

# बीड येथे विद्यार्थिनीवरील लैंगिक छळप्रकरणी कठोर कारवाई करा

## विधानपरिषद उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे यांची विशेष मागणी

बीड। प्रतिनिधी

बीड येथील एका खासगी कोचिंग क्लासमध्ये विद्यार्थिनीवर झालेल्या लैंगिक छळाच्या धक्कादायक घटनेची गंभीर दखल घेत विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी आज विशेष पोलीस महानिरीक्षक, छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्र यांना पत्र पाठवून तत्काळ आणि कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

डॉ. गोऱ्हे यांनी या प्रकरणाला संतापजनक आणि समाजाला हादरवून टाकणारे म्हटले असून, अल्पवयीन विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेबाबत हे गंभीर प्रश्न उपस्थित करणारे असल्याचे स्पष्ट केले आहे. शिक्षणाच्या उद्देशाने कोचिंग क्लासमध्ये गेलेल्या मुलीवर असे अत्याचार होणे हे कोणत्याही सुसंस्कृत समाजासाठी लज्जास्पद असून, अशा घटकांना वेळीच थांबवणे गरजेचे आहे, असे त्या म्हणाल्या.

पान २ वर

# रविंद्र चव्हाण यांची भाजप महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदी निवड!

मुंबई। प्रतिनिधी

खूप दिवस चर्चा सुरु असलेल्या महाराष्ट्राच्या भाजपा प्रदेशाध्यक्षपदी अपेक्षेप्रमाणे आमदार रविंद्र चव्हाण यांची निवड झाली आहे. सध्या ते महाराष्ट्र भाजपचे कार्याध्यक्षपद म्हणून काम करत होते. मंगळवारी मुंबई येथे निरीक्षक केंद्रीयमंत्री किरण रिजिजू यांच्या उपस्थितीत चव्हाण यांची निवड करण्यात आली. विद्यमान प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडून चव्हाण यांनी सूत्रे स्वीकारली आहेत. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आशिष शेलार, विनोद तावडे यासह भाजपाचे सर्व आमदार, पदाधिकारी उपस्थित होते.

पान २ वर



## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.०१ जुलै २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १८.०० क्विंटल | २,३९० | २,६०० | २,५४८ |
| ज्वारी/हायब्रिड: ७८.०० क्विंटल | १,९५१ | २,८८० | २,४५९ |
| मका/लोकल:३.०० क्विंटल | २,२०१ | २,२०१ | २,२०१ |
| तूर :७.५० क्विंटल | ६,४३१ | ६,७०० | ६,६०० |
| उडीद : १.०० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| बाजरी: ४६.५० क्विंटल | १,९९१ | २,६५० | २,३५४ |
| मुग :१.०० क्विंटल | ५,००० | ६,२०० | ५,६०० |
| सोयाबीन:१४.५० क्विंटल | ४,२०० | ४,२५० | ४,२१६ |
| हरभरा: ६.५० क्विंटल | ५,३०० | ६,८७० | ५,६७४ |

# बीडमधील सहकार संकुलाच्या उभारणीसाठी दहा कोटी रुपयांची तरतुद

## आ.विजयसिंह पंडित यांच्या पाठपुराव्याला यश, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे मानले आभार

मुंबई। प्रतिनिधी

राज्याचे उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांनी बीड जिल्ह्याचे पालकमंत्री पद स्विकारल्यानंतर बीड जिल्ह्याच्या वैभवात भर पडेल अशा अनेक विकासकामांना त्यांनी मंजुरी दिली आहे. बीड शहरातील सहकार विभागाच्या मालकीच्या जागेत भव्य सहकार संकुलाची इमारत उभी करण्याची मागणी आ. विजयसिंह पंडित यांनी ना. अजितदादा पवार यांच्याकडे केली होती. आ. पंडित यांच्या मागणीला दादांनी प्रतिसाद देत





दि.४ जून रोजी सहकार संकुलाच्या बांधकामासाठी १४ कोटी ९८ लाख किंमतीच्या कामास प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिली होती. विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनातील पुरवणी मागण्यांमध्ये या कामासाठी १० कोटी रुपयांची भरीव तरतुद केल्याबद्दल आ. विजयसिंह पंडित यांनी उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री ना. अजितदादा पवार यांचे आभार मानले आहेत. आ. विजयसिंह पंडित यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे बीड शहरात सहकार विभागाला देखणी वास्तू मिळणार आहे.

बीड शहरातील जालना रोड भागात नगर भुमापन क्र.१७९९ मधील सहकार विभागाच्या मालकीच्या जागेत सहकार संकुलाच्या इमारतीचे बांधकाम करावे यासाठी आ. विजयसिंह पंडित यांनी सातत्याने शासन दरबारी पाठपुरावा केला होता. सहकार विभागाच्या अधिपत्याखालील दहा क्षेत्रीय कार्यालयांना एकाच इमारतीमध्ये यामुळे जागा मिळणार आहे. एका छताखाली ही कार्यालये एकत्रित आल्यामुळे सर्वसामान्य लोकांना यामुळे सुविधा मिळणार आहे. बीड जिल्ह्याचे पालकमंत्री पद स्विकारल्यानंतर उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांच्या कार्यकाळात बीड शहराच्या वैभवात भर पडेल अशी देखणी वास्तु त्यांच्या कारकिर्दीत उभारली जावी यासाठी आ. विजयसिंह पंडित प्रयत्नशील होते. त्यांच्या प्रयत्नांमुळे सहकार संकुल इमारतीच्या बांधकामासाठी १४ कोटी ९८ लक्ष रुपयांच्या कामाला दि.४ जून रोजी प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळाली होती. उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री ना. अजितदादा पवार यांनी बीड शहरातील सहकार संकुलाच्या इमारत बांधकामासाठी पावसाळी

पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# विरोधकांना नवे बळ तर सत्ताधाऱ्यांची पिछेहाट !

महाराष्ट्र विधानसभेचे पावसाळी अधिवेशन सोमवारपासून सुरू झाले असून पहिल्याच दिवशीच वातावरण तापले. पहिलीपासून हिंदी लागू करण्याच्या त्रिभाषासूत्रातील निर्णयाला सर्व स्तरातील मराठी जनतेच्या तीव्र विरोधामुळे सरकारने अधिवेशनाच्या तोंडावरच मागे घेतले. उद्धव ठाकरे व राज ठाकरे यांच्या एकत्र येऊन आंदोलन करण्याच्या निर्धारामुळे हा विषय खूपच चर्चेत आला आणि सरकारला माघार घ्यावी लागली. आता नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली नवी अभ्यास समिती नेमण्यात आली असून यंदाच्या वर्षी हिंदी शिकवली जाणार नाही हे स्पष्ट झाले आहे. तर यापुढे पुन्हा हिंदी लागण्याचा प्रयत्न करून पहाच असा इशारा ठाकरे बंधूंनी दिला आहे. ठाकरे यांनी आता ५ जुलै रोजी मोर्चा ऐवजी विजय मेळावा घेण्याचे घोषित केले आहे. काही मुद्द्यांवर दोघांकडून एक सारखी भूमिका मांडली गेल्याने राजधानी मुंबईत मराठी मतदार एकवटण्याची स्थिती निर्माण होऊ लागली आहे. या पार्श्वभूमीवर माघार घेताना सरकारने समिती नेमून आपण पूर्णत: मागे हटलो नाही असे दाखवण्याचा प्रयत्न केला आहे.

याच मुद्द्यावर विधानसभेच्या दारात सरकारकडून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आंदोलन केले, त्याला प्रत्युत्तर म्हणून आदित्य ठाकरेही उतरले. तर पत्रकारांशी बोलताना दोन्ही ठाकरे बंधूंनी हिंदी लादू दिली जाणार नाही, अशी ठाम भूमिका घेतली. यामुळे विरोधकांचे मनोबल उंचावल्याचे दिसून आले आहे. सत्ताधारी महायुतीला बहुमत असूनही हिंदी विषयात पाय मागे घेतल्यानंतर अधिवेशनात तीव्र चुरस निर्माण झाली आहे. हे अधिवेशन सरकार व विरोधक यांच्यातील संघर्षामुळे गाजणार आहे. शक्तिपीठ महामार्ग, धारावी पुनर्विकास, जन सुरक्षा विधेयक, मंत्र्यांचे घोटाळे, कर्जमाफी आणि मंत्र्यांची अंधश्रद्धा यांसारख्या मुद्द्यांवर वादविवाद अपेक्षित आहेत. सरकारकडे २३५ जागांचे संख्याबळ असले तरी जनभावनेच्या मुद्द्यांवर सरकार अडचणीत सापडत आहे. शक्तीपीठ महामार्ग आणि त्याला शेतकऱ्यांचा विरोध चर्चेत आहे. नागपूर-गोवा 'इकॉनॉमिक कॉरिडॉर' म्हणून प्रस्तावित असलेला शक्तिपीठ महामार्ग विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्र जोडणार आहे. सरकारच्या मते, यामुळे अर्थव्यवस्था आणि पर्यटनाला चालना मिळेल. मात्र पश्चिम महाराष्ट्रात, विशेषत: सांगली-कोल्हापूर भागात जमीन अधिग्रहणाला तीव्र विरोध होत आहे. मराठवाड्यातही या विरोधात बळ एकवटले जात आहे. यासाठी मंगळवारी राज्यभर आंदोलन करण्यात आले. तर विरोधकांनी यावर आवाज उठविला. नाना पटोले हे या विषयावर चांगलेच भडकले आणि त्यांनी थेट सभापतींकडे धाव घेतली. त्यानंतर सत्ताधाऱ्यांनी आपला अधिकार वापरत नाना पटोले यांना एक दिवसासाठी निलंबीत केले. यामुळे विरोधकांनीही सभात्याग केला. एकूणच वातावरण चांगलेच तापले. यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या तोंडावर सरकार या विषयालाही काही काळापुरते थंड करते की काय? अशी शंका उत्पन्न होत आहे. विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर सरकारने अशीच या प्रकरणी माघार घेतली होती. याशिवाय देशातील सर्वात मोठ्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनांपैकी एक असलेल्या धारावी प्रकल्पावर सरकारचा भर आहे. धारावीतील रहिवाशांना उत्तम घरे व सुविधा मिळणार असल्याचा दावा केला जात आहे. मात्र विरोधकांच्या मते, प्रकल्प खासगी कंपन्यांना लाभ पोहोचवणारा आहे आणि स्थानिक रहिवाशांचे हित दुर्लक्षित होत आहे. प्रकल्पग्रस्त यादीतील अनेक रहिवाशांची नावे वगळल्याने सर्व भाषिक समाजात असंतोष आहे. आदित्य ठाकरे धारावीत सभा घेऊन या असंतोषाला दिशा देत आहेत. या अधिवेशनातील सर्वाधिक वादग्रस्त मुद्दा म्हणजे जन सुरक्षा विधेयक. सरकारने विधेयक रेटून मंजूर करण्याचा निर्धार व्यक्त केला असून विरोधक व सामाजिक संघटनांचा तीव्र विरोध आहे. आरोप आहे की, यामुळे पोलिसांना अमर्याद अधिकार मिळणार असून नागरिकांच्या स्वातंत्र्यावर गदा येईल. राज्यभरात १२ हजार हरकती दाखल झाल्या असून अनेक जिल्ह्यांमध्ये आंदोलने झाली आहेत. काँग्रेसने हे विधेयक उद्योगपतींच्या फायद्यासाठी असल्याचा आरोप केला असून राहुल गांधींनी सुद्धा यावर टीका केली आहे. मात्र विरोधकांनी अजून पुरेशी ताकद लावलेली नाही.

सत्ताधारींचे संख्याबळ आणि विरोधकांची रणनीती यावेळी चर्चेत आहे. महायुतीकडे स्पष्ट बहुमत असून विधेयक मंजुरी सोपी आहे. पण हिंदीच्या मुद्द्यांवर माघार घेतल्याने विरोधकांना नवे बळ मिळाले आहे. महाविकास आघाडी सभागृहाबाहेरील आंदोलने, स्वयंसेवी संस्थांशी सहकार्य आणि प्रश्नोत्तरांचा तास, लक्षवेधी सूचना यांचा उपयोग करून सरकारला घेरण्याचा प्रयत्न करणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका तोंडावर असल्याने सरकारची अडचण वाढली आहे. ग्रामीण व शहरी भागातील अस्मितेचे आणि जनभावनेचे मुद्दे आता अधिवेशनाच्या चर्चेत येणार आहेत. हिंदीचा मुद्दा पुन्हा येईल, असा इशारा सरकार देत असले तरी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर त्याला पुढे नेणे कठीण आहे. सत्ताधाऱ्यांचे संख्याबळ प्रभावी असले तरी विरोधकांचे मनोबल वाढले आहे. जनतेच्या प्रश्नांवर त्यांनी भूमिका घेतल्यास अधिवेशनातील संघर्ष निर्णायक ठरू शकतो. म्हणूनच, हे अधिवेशन केवळ विधेयकांच्या मंजुरीपुरते मर्यादित न राहता राज्याच्या राजकीय-सामाजिक दिशादर्शनासाठी निर्णायक ठरण्याची शक्यता आहे.

# विनयभंग व पोक्सो च्या गुन्ह्यात अवघ्या ४८ तासांत दोषारोपपत्र कोर्टात दाखल

## पिंक पथक माजलगाव यांची कामगिरी

**माजलगांव । प्रतिनिधी**

**राज्यात तसेच बीड जिल्हयात महिला व अल्पवयीन मुलींवरील अत्याचाराच्या घटना सध्या संवेदनशील बनलेल्या आहेत. बिड जिल्हयाचे कर्तव्यनिष्ठ पोलीस अधिक्षक नवनित काँवत यांनी प्रभार घेतल्या पासुन विविध जनतेसाठी विविध उपक्रम राबविण्यास सुरुवात केलेली आहे. नुकतीच पोलीस अधीक्षक यांनी सर्वसामान्य तक्रारदार यांना तात्काळ न्याय मिळण्या करीता एन.सी दाखल गुन्हयामध्ये ''समाधान ४८'' हि योजना सुरु केली आहे.**

त्यामुळे सामान्य लोकांमध्ये पोलीसां बदल प्रतीमा सुधारत असतांना त्यातच पिंक पथक माजलगाव यांनी कौतुकास्पद कामगीरी केली आहे.पोलीस स्टेशन माजलगांव शहर येथे दि.२९ जुन २०२५ रोजी रात्री एका अल्पवयीन पिडीतेने दिलेल्या फिर्यादी वरुन आरोपी विठठल लिंबुरे याचे विरुध्द गुरनं २४०/२०२५ कलम ७४,७८,३५१,३५२ बीएनएस व ८,१३ पोक्सो प्रमाणे गुन्हा दाखल झाला होता, सदर गुन्हयाचा पुढील तपास हा पिंक पथकाकडे आला असता पिंक पथकाने गुन्हयाचे गांभीर्य ओळखुन तात्काळ गुन्हयातील आरोपी विठ्ठल लिंबुरे याला अटक केली.तसेच त्याला कोर्टासमोर हजर करुन त्याचा पोलीस कोठडी घेउन त्याने गुन्हयात वापरलेली मोटारसायकल जप्त केली व संपुर्ण तपास अतीशय जलदगतीने करुन या विनयभंग व पोक्सोच्या गुन्हयामध्ये अवघ्या ४८ तासांत दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले आहे.पोक्सो च्या गुन्हयामध्ये आतापर्यंत संपुर्ण बीड जिल्हयात इतक्या जलदगतीने दोषारोपपत्र दाखल केल्याचे हे पहिलेच प्रकरण आहे. पोलीसांच्या कार्यतत्परतेमुळे महिला व मुलींमध्ये सुरक्षेची भावना वाढीस लागनार आहे. सदर गुन्हयाचा तपास हा नवनित काँवत पोलीस अधिक्षक बीड, चेतना तीडके अपर पो.अधिक्षक अंबाजोगाई,निरज राजगुरु उप. विभागीय पोलीस अधिकारी माजलगाव यांचे मार्गदर्शनात पिंक पथक माजलगावचे प्रभारी अधिकारी सहायक पोलीस निरीक्षक महेश भोसले व पोहेकॉ/१५६४ नवनाथ गोरे यांनी केला आहे.

# राधाई वारकरी शाळेच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप



**अंमळनेर । प्रतिनिधी**

पाटोदा तालुक्यातील तगारा गावाच्या धारागिरी डोंगर माथ्यावर सुरू असलेल्या राधाई वारकरी शिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले .ठाणे जिल्ह्यातील शहापूर येथील उद्योजक रमेश होडावडेकर यांच्यामार्फत सदर शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय वहया पुस्तके, शालेय उपयोगी सर्व शैक्षणिक साहित्य तसेच क्रीडा साहित्याचे ही वाटप करण्यात आले. इयत्ता चौथी ते दहावीपर्यंतचे पिंपळगाव धस येथे शिक्षण घेत असलेले या राधाई वारकरी शिक्षण संस्थेतील २० विद्यार्थ्यांना या साहित्याचे वाटप करण्यात आले. शैक्षणिक शिक्षण घेत असतानाच या राधाई वारकरी शिक्षण संस्थेत राहून या विद्यार्थ्यांनी धार्मिक, सांप्रदायिक ज्ञानर्जन आत्मसात करून विविध वाद्यांचेही आकलन केले आहे. तर इच्छुक दात्यांनीही या विद्यालयातील विद्यार्थ्यांना चालना मिळण्यासाठी साहित्य, अन्नदान, वस्तू स्वरूपात मदत करणार असल्यास राधाई संस्थेची संपर्क साधून, मदतीचं आवाहन केले आहे.

# अवैध दारू विक्री करणाऱ्या दुकानावर पोलिसांचा छापा



**अंमळनेर । प्रतिनिधी**

अंमळनेर पोलीस स्टेशन अंतर्गत महिंदा बीट हद्दीत पोलिसांची रात्रीची गस्त सुरू असताना गुप्त माहिती मिळाली की नागतळा येथील नागनाथ मंदिराच्या जवळील पत्र्याच्या शेडमध्ये विनापरवाना अवैद्यरित्या देशी दारूची विक्री होत आहे. त्यानुसार अंमळनेर पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक शिरसाठ बि.आर. पोलीस कॉन्स्टेबल श्याम खाडे, पोलीस कॉन्स्टेबल राठोड ,महिला पोलीस हवालदार सापते यांच्या पथकाने माहितीच्या आधारावरून सदर दुकानावर रात्री नऊच्या दरम्यान छापा टाकला यावेळी अनेकांनी मद्यधुंद अवस्थेत तेथून पळ काढला. तर अवैधरित्या, विनापरवाना देशी दारू विक्रेता संभाजी रामचंद्र गोरे राहणार नागतळा याला ताब्यात घेऊन, गावातील दोन पंचांच्या साक्षीने पत्रा शेडची झाडाझडती घेतली असता तेथे ९६००/-रु. किंमतीचे देशी दारू चे बॉक्स मिळून आले.तर मुद्देमाल हस्तगत करून, म.द.अ. प्रमाणे कलम ६५ (इ) नुसार कारवाई झाली असून, पोलीस निरीक्षक सपकाळ यांच्या मार्गदर्शना खाली पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक शिरसाट बी. आर. करत आहेत.

## पान १ वरून...

### सरकार शेतकरीविरोधी

तर आम्ही त्याला पूर्ण समर्थन देतो.'' असे आव्हाड म्हणाले. तसेच रोहित पवार यांनी विधानभवनाबाहेर बोलताना तत्कालीन सरकारवर 'गजनी सरकार' आणि 'विसरभोळा कारभार' अशी टीका केली. ते म्हणाले, ''सातबारा कोरा करू अशी घोषणा केली गेली, पण ती फक्त घोषणाच राहिली. भावांतर योजना, कर्जमाफी, पिकविमा या सगळ्या बाबतीत सरकारने कुठलीही ठोस कृती केलेली नाही. मुख्यमंत्री बिहारला गेले असताना मोदींनी केलेल्या घोषणांचा काहीही ठसा अद्याप सरकारकडून मिळालेला नाही. त्यामुळे या सरकारवर शेतकरी विश्वास ठेवायला तयार नाही. विधानसभा अध्यक्षांवर धावून गेल्याचा आरोप करत देवेंद्र फडणवीस यांनी पटोले यांच्यावर कारवाई करण्याची मागणी केली होती. त्यावर पटोले यांनी त्यांची भूमिका मांडली. पटोले म्हणाले, ''जर सरकारमध्ये थोडी तरी धमक असती, तर त्यांनी स्वतःच्या कृषीमंत्री आणि आमदारांवर कारवाई केली असती. मुख्यमंत्री म्हणतात की मी अध्यक्षांच्या आसनाजवळ गेलो आणि धमकावलं. हे त्यांनी रेकॉर्डवर आणले आहे. मी स्वतः विधानसभा अध्यक्ष राहिलो आहे, मला नियम माहिती आहेत. जेव्हा सरकार जनतेच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करतं, तेव्हा विरोधकांनी कठोर भूमिका घ्यावीच लागते. मी शेतकरी आहे, आणि माझ्या शेतकऱ्यांचा अपमान मी कधीही सहन करणार नाही. आमचा पक्षही हे सहन करणार नाही.'' असंही नाना पटोले म्हणाले.

----------

### कृषीदिनी शेतकऱ्यांचा लढा पेटला;

असतील तर शेतकरीसुद्धा कमी नाहीत. ते जिथे असतील तिथे रास्ता रोको करतील. पोलिसांची पळता भुई थोडी होईल. हे लाक्षणिक आंदोलन आहे हे प्रशासनाने लक्षात घ्यावे, असा इशाराही शेट्टी यांनी दिला. दरम्यान, आंदोलनामुळे अनेक ठिकाणी वाहतूक ठप्प झाली. विशेषतः कोल्हापूर आणि सांगलीत रस्ते रोखण्यात आले. सरकारवर दबाव वाढत असताना, शेतकऱ्यांनी जोपर्यंत मागण्या मान्य होत नाहीत, तोपर्यंत लढा सुरू ठेवण्याचा इशारा दिला आहे. शक्तिपीठ महामार्गाविरोधातील हे आंदोलन शेतकऱ्यांच्या एकजुटीचे आणि सरकारच्या धोरणांविरुद्धच्या असंतोषाचे प्रतीक बनले आहे. येत्या काळात आंदोलनाची तीव्रता वाढण्याची शक्यता आहे.

------------

### आ.धनंजय मुंडेंच्या खळबळजनक

चहाच्या टपरीवर मी जातो, तिथे लोकं येतात, भेटतात. संबंधित लोक माझ्या ओळखीचे आहेत. पीडितेकडे मी जाणार होतो. मात्र, आताच जाणे योग्य नाही, त्यामुळे तिथे गेलो नाही, असे त्यांनी यावेळी सांगितले.

---------

### बीड प्रकरणाचा तपास आता

कालमर्यादा निश्चित करून दिली जाणार असून, त्यांनी दिलेल्या वेळेत तपास पूर्ण करणे बंधनकारक असणार आहे, असेही श्री फडणवीस म्हणाले. या घोषणेनंतर धनंजय मुंडे यांनी आपण केलेली मागणी राज्य सरकारने २४ तासांच्या आत मान्य केल्याबद्दल राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित दादा पवार तसेच उपुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आभार मानले असून, या प्रकरणातील पीडितांना न्याय मिळेपर्यंत आपण हे प्रकरण लावून धरू असा निर्धार मुंडेंनी व्यक्त केला आहे.

-------------

### बीड येथे विद्यार्थिनीवरील लैंगिक

या प्रकरणात संबंधित विद्यार्थिनीने धैर्याने पुढे येत पोलिसांकडे तक्रार दिली असून आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. तसेच, अशा प्रकरणांमध्ये त्वरित न्यायप्रक्रिया आणि कठोर कायदेशीर कारवाई आवश्यक असल्याचे डॉ. गोऱ्हे यांनी नमूद केले आहे. त्यांनी आरोपींविरुद्ध कठोर कारवाई आणि जलद न्यायप्रक्रिया सुरू करणे, पीडित विद्यार्थिनीला मानसिक, कायदेशीर आणि सामाजिक आधार देणे, बीड जिल्ह्यातील तसेच इतर खासगी कोचिंग क्लासेसची सुरक्षिततेच्या दृष्टीने तपासणी करणे, तसेच अशा संस्थांमध्ये ठोस आचारसंहिता व प्रतिबंधात्मक उपायांची प्रभावी अंमलबजावणी करणे या बाबींवर तातडीने कार्यवाही करण्याचा आग्रह धरला आहे. ''या प्रकरणाकडे 'शून्य सहनशीलता'च्या दृष्टिकोनातून पाहून तत्काळ कारवाई व्हावी, अशी जनतेचीही अपेक्षा आहे. महिला सुरक्षेच्या दृष्टीने शासन आणि पोलीस प्रशासनाने ठोस पावले उचलली पाहिजेत,'' असे स्पष्ट मत उपसभापती डॉ. गोऱ्हे यांनी व्यक्त केले.

-------------

### अपघात झाल्यास वारकऱ्याला

या निर्णयामुळे वारीदरम्यान घडणाऱ्या अनपेक्षित घटनांमध्ये वारकऱ्यांच्या कुटुंबीयांना आर्थिक आधार मिळणार आहे. १६ जून ते १० जुलै २०२५ या कालावधीत वारीदरम्यान जर एखाद्या वारकऱ्याचा अपघात, विषबाधा किंवा इतर नैसर्गिक कारणामुळे मृत्यू झाला, तर त्यांच्या कुटुंबीयांना ही रक्कम मिळणार आहे. मात्र आत्महत्येच्या घटनांमध्ये ही मदत लागू होणार नाही. याशिवाय, वारीदरम्यान अपघातामुळे अपंगत्व आल्यास देखील आर्थिक मदतीची तरतूद आहे. शासनाच्या नव्या परिपत्रकानुसार, विठ्ठलाच्या दर्शनासाठी येणाऱ्या वारकऱ्यांकरता ही मदत लागू करण्यात आली आहे. आत्महत्या, विषबाधा तसेच खून वगळून इतर नैसर्गिक मृत्यू अपघाताने झालेल्या दुर्घटनांमध्ये ही आर्थिक मदत शासनाच्या वतीने दिली जाणार आहे.

----------

### रविंद्र चव्हाण यांची भाजप महाराष्ट्र

मुंबईतील वरळी डोममध्ये हा कार्यक्रम संपन्न झाला. अत्यंत भव्यदिव्य अशा या कार्यक्रमाला आत्तापर्यंतची रेकॉर्ड ब्रेक गर्दी झाली होती. सर्व आसन व्यवस्था फुल्ल झाल्याने भाजप कार्यकर्त्यांना उभे राहून कार्यक्रम पाहावा लागला. विधानसभा निवडणूकीनंतर मंत्रिमंडळात संधी न मिळाल्याने काहीसा नाराज असलेल्या चव्हाण यांना पक्षश्रेष्ठींनी दिलेले प्रदेशाध्यक्षपदाचे आश्वासन पूर्ण झाले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली भाजपने कोकण आणि इतर भागांत पक्षविस्तारावर भर देण्याचा निर्धार केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही कोकणात पक्षवाढीसाठी चव्हाण यांच्या योगदानाचे कौतुक केले होते. विद्यमान प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे हे राज्याचे महसूल मंत्री झाल्याने प्रदेश भाजपच्या अध्यक्षपदासाठी रविंद्र चव्हाण यांचे नाव जवळपास निश्चित झाले होते. ते डोंबिवली विधानसभा मतदारसंघाचे आमदार आहेत. जानेवारी २०२५ मध्ये त्यांच्याकडे राज्याच्या कार्याध्यक्षपदाची जबाबदारी देण्यात आली. रविंद्र चव्हाण हे भाजपच्या युवा मोर्चातून राजकारणात आले असून, कल्याण-डोंबिवली महापालिकेत नगरसेवक, स्थायी समिती अध्यक्ष, चार वेळा आमदार, भाजप प्रदेश सरचिटणीस, मंत्रीपद अशा विविध जबाबदाऱ्या त्यांनी सांभाळल्या आहेत. डोंबिवली मतदारसंघातून ते सलग चौथ्यांदा निवडून आले आहेत. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक म्हणून कारकिर्दीस सुरुवात करून भाजपच्या प्रदेशाध्यक्षपदापर्यंतचा त्यांचा प्रवास उल्लेखनीय आहे. रविंद्र चव्हाण यांच्या निवडीमुळे भाजपच्या महाराष्ट्रातील संघटनात्मक कामकाजाला नवे नेतृत्व मिळाले असून, आगामी निवडणुकांसाठी पक्षात नवचैतन्य येण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

-----------

### आम्ही वाट बघतोय...!

येणार आहेत, याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे. संयज राऊत यांनी शेअर केलेल्या पत्रात म्हटले आहे की, ''मराठी मातांनो, भगिनींनो आणि बांधवांनो, सरकारला नमवलं का? तर हो नमवलं! कोणी नमवलं? तर तुम्ही मराठी जनतेनं! आम्ही केवळ तुमच्या वतीने संघर्ष करत होतो.'' ''आता आनंद साजरा करण्याची वेळ आली आहे. आम्ही आयोजक आहोत, पण जल्लोष तुम्हालाच करायचा आहे. वाजत-गाजत, गुलाल उधळत या आम्ही वाट बघतोय!''

-----------

### बीडमधील सहकार संकुलाच्या उभारणीसाठी

अधिवेशनातील पुरवणी मागण्यांमध्ये दहा कोटी रुपयांची भरीव तरतुद केली आहे. बीड शहराच्या मध्यवस्तीमध्ये मोक्याच्या ठिकाणी नगर भुमापन क्र.१७९९ मधील १५१५.९७ चौ.मिटर जागेवर ना. अजितदादा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली भव्य आणि देखणी वास्तु उभारण्यात येणार असल्याचे आ. विजयसिंह पंडित यांनी या बाबत माहिती देताना सांगितले. जिल्हा उपनिबंधक कार्यालयासह सहकार विभागाशी संबंधित दहा कार्यालये एकाच छताखाली या माध्यमातून येणार असून त्यामुळे प्रशासकीय कामात सुसूत्रता येऊन सर्वसामान्य नागरीकांना त्याचा लाभ होणार आहे. बीड जिल्ह्याचे पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांनी दहा कोटी रुपयांची भरीव तरतुद केल्याबद्दल आ. विजयसिंह पंडित यांनी त्यांचे आभार मानले आहेत.

## टी.सी.हरवला आहे

माने अश्विनी शंकर या नावाचा १२ वी पासचा टी.सी वडवणी ते बीड प्रवासादरम्यान हरवला आहे. ज्या कोणास सापडल्यास खालील नंबर वर संपर्क करावा.

::::: **संपर्क** :::::
**मो.९७६३४८१८२५**

**कार्यालय नगरपंचायत घनसावंगी जि. जालना**
**प्रशासकीय इमारत, घनसावंगी**
npghansawangi@gmail.com PH.no ०२४८३-२७१७८७
जा.क्र.२०२५/नपघ/जा.प्र./कावी-१२८१
दिनांक: ३०/०६/२०२५

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार अंकुश भिकाजी बोबडे रा.ता.जि. औरंगाबाद यांनी नामे १. बाळकृष्ण दासराव भाकरे २. देवेन बाळकृष्ण भाकरे रा.ता.जि. औरंगाबाद यांच्याकडुन रजिस्टर दस्त क्रं ३९९० दि. १९/१२/२०२२ या खरेदीदस्ताची सत्य प्रत जोडुन आवक क्रं १९५२ दिनांक:- २७/०६/२०२५ रोजी नामांतर करण्यासाठी अर्ज सादर केला आहे. १. बाळकृष्ण दासराव भाकरे २. देवेन बाळकृष्ण भाकरे रा.ता.जि. औरंगाबाद नावावर असलेला गट नं (२३९) मधील प्लॉट नं. ३९ सि.स.नं. ज्याचा मिळकत क्रं १५७४/३९ मधील क्षेत्र ५२.९० चौ.मी नावे करणेस्तव ज्याची चतु: सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्व :- प्लॉट नं.४०
पश्चिम : प्लॉट नं.३८
दक्षिण : प्लॉट नं. ४४
उत्तरेस : ९ मिटर कॉलनी अंतर्गत रोड

या वरील चतुः सिमा मधील ५२.९० चौ.मी जागा खरेदीदस्ता आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/ आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन या कार्यालयात १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्या सह आक्षेप अर्ज दाखल करावा. नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणने नाही. असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्याने दिले आहे.

**स्वाक्षरीत**
**मुख्याधिकारी नगरपंचायत घनसांवगी**

**कार्यालय नगरपंचायत घनसावंगी जि. जालना**
**प्रशासकीय इमारत, घनसावंगी**
npghansawangi@gmail.com PH.no ०२४८३-२७१७८७
जा.क्र.२०२५/नपघ/जा.प्र./कावी-१२८१
दिनांक: ३०/०६/२०२५

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार अंकुश भिकाजी बोबडे रा.ता.जि. औरंगाबाद यांनी नामे १. बाळकृष्ण दासराव भाकरे २. देवेन बाळकृष्ण भाकरे रा.ता.जि. औरंगाबाद यांच्याकडुन रजिस्टर दस्त क्रं ३९९१ दि. १९/१२/२०२२ या खरेदीदस्ताची सत्य प्रत जोडुन आवक क्रं १९५२ दिनांक:- २७/०६/२०२५ रोजी नामांतर करण्यासाठी अर्ज सादर केला आहे. १. बाळकृष्ण दासराव भाकरे २. देवेन बाळकृष्ण भाकरे रा.ता.जि. औरंगाबाद नावावर असलेला गट नं (२३९) मधील प्लॉट नं. ४० सि.स.नं. ज्याचा मिळकत क्रं १५७४/४० मधील क्षेत्र ५२.९० चौ.मी नावे करणेस्तव ज्याची चतु: सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्व :- प्लॉट नं.४१
पश्चिम : प्लॉट नं.३९
दक्षिण : प्लॉट नं. ४३
उत्तरेस : ९ मिटर कॉलनी अंतर्गत रोड

या वरील चतुः सिमा मधील ५२.९० चौ.मी जागा खरेदीदस्ता आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/ आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन या कार्यालयात १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्या सह आक्षेप अर्ज दाखल करावा. नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणने नाही. असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्याने दिले आहे.

**स्वाक्षरीत**
**मुख्याधिकारी नगरपंचायत घनसांवगी**

**कार्यालय नगरपंचायत घनसावंगी जि. जालना**
**प्रशासकीय इमारत, घनसावंगी**
npghansawangi@gmail.com PH.no ०२४८३-२७१७८७
जा.क्र.२०२५/नपघ/जा.प्र./कावी-१२८१
दिनांक: ३०/०६/२०२५

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार अंकुश भिकाजी बोबडे रा.ता.जि. औरंगाबाद यांनी नामे १. बाळकृष्ण दासराव भाकरे २. देवेन बाळकृष्ण भाकरे रा.ता.जि. औरंगाबाद यांच्याकडुन रजिस्टर दस्त क्रं ३९९२ दि. १९/१२/२०२२ या खरेदीदस्ताची सत्य प्रत जोडुन आवक क्रं १९५२ दिनांक:- २७/०६/२०२५ रोजी नामांतर करण्यासाठी अर्ज सादर केला आहे. १. बाळकृष्ण दासराव भाकरे २. देवेन बाळकृष्ण भाकरे रा.ता.जि. औरंगाबाद नावावर असलेला गट नं (२३९) मधील प्लॉट नं. ४१ सि.स.नं. ज्याचा मिळकत क्रं १५७४/४१ मधील क्षेत्र ७४.४१ चौ.मी नावे करणेस्तव ज्याची चतु: सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्व :- गट नं.३९ मधील जमीन
पश्चिम : प्लॉट नं.४०
दक्षिण : प्लॉट नं. ४२
उत्तरेस : ९ मिटर कॉलनी अंतर्गत रोड

या वरील चतुः सिमा मधील ७४.४१ चौ.मी जागा खरेदीदस्ता आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/ आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन या कार्यालयात १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्या सह आक्षेप अर्ज दाखल करावा. नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणने नाही. असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्याने दिले आहे.

**स्वाक्षरीत**
**मुख्याधिकारी नगरपंचायत घनसांवगी**

cmyk

# शेतकऱ्यांना डिबीटी पोर्टलद्वारे निधी वितरीत होणार

**जालना | प्रतिनिधी**

**जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी डि.बी.टी. पोर्टलद्वारे शासनाकडून येत्या दोन ते तीन दिवसात खालीलप्रमाणे तालुकानिहाय निधी वितरीत होणार आहे.**

यामध्ये परतुर तालुक्यातिल २१३ शेतकऱ्यांसाठी २७ लक्ष ४५ हजार ९९ रुपये निधी वितरीत होणार आहे. मंठा तालुक्यातील ५७० शेतकऱ्यांसाठी ६७ लक्ष २५ हजार ७८९ रुपये, जालना तालुक्यातील ३४७ शेतकऱ्यांसाठी ३० लक्ष ७९ हजार ३९२ रुपये, जाफ्राबाद तालुक्यातिल ५१२ शेतकऱ्यांसाठी ५३ लक्ष ९० हजार, घनसावंगी तालुक्यातील १ हजार ७१७ शेतकऱ्यांसाठी २ कोटी ५४ लक्ष ५ हजार ९० रुपये, भोकरदन तालुक्यातील १३१ शेतकऱ्यांसाठी २१ लक्ष १० हजार ६७१ रुपये, बदनापुर तालुक्यातील ५५ शेतकऱ्यांसाठी ८ लक्ष ४१ हजार ८७४ रुपये, अंबड तालुक्यातील ५ हजार ७३२ शेतकऱ्यांसाठी ११ कोटी २८ लक्ष १ हजार १४६ रुपये असे एकुण जिल्ह्यासाठी ९ हजार २७७ शेतकऱ्यांसाठी १५ कोटी ९० लक्ष ९९ हजार ८८ रुपये इतका निधी वितरीत होणार असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आली.


राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

बुधवार दि. ०२ जुलै २०२५




# अवैध शुल्क व मनमानी कारभार करणाऱ्या आपले सरकार केंद्रांवर उपविभागीय अधिकाऱ्यांची धडक कारवाई


**अंबाजोगाई | प्रतिनिधी**

शासनाने सर्वसामान्य जनतेला विविध शासकीय सेवा सुलभ व पारदर्शक पद्धतीने मिळाव्यात या उद्देशाने सुरु केलेल्या 'आपले सरकार सेवा केंद्र' ही योजना अंबाजोगाई तालुक्यात काही ठिकाणी लूटमाराचे साधन बनली आहे, हे समोर आल्यानंतर महसूल विभागाने धडक कारवाई करत एकाच दिवशी पाच सेवा केंद्रांची तपासणी केली. या कारवाईत गंभीर त्रुटी आढळून आल्याने तीन सेवा केंद्रांचे परवाने रद्द करण्यात आले असून एका केंद्राविरोधात पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही तपासणी बल्लारपूर (जि. चंद्रपूर) येथील सामाजिक कार्यकर्त्या प्रिया झांबरे यांच्या तक्रारीच्या पार्श्वभूमीवर करण्यात आली. त्यांनी अंबाजोगाई येथील सेवा केंद्रांमध्ये जात प्रमाणपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र व इतर कागदपत्रांसाठी शासनाने निश्चित केलेल्या रकमेपेक्षा अधिक पैसे घेतल्याचे व्हिडीओसह सादर केले होते. या व्हिडीओ क्लिप्स सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाल्यानंतर प्रशासन हरकत घेत उपविभागीय अधिकारी दीपक वजाळे यांच्या मार्गदर्शनाखाली पथक स्थापन करून कारवाई केली.

तपासणीअंती तीन केंद्रांचे परवाने रद्द, एका अवैध केंद्रावर गुन्हा

उपविभागीय कार्यालयाच्या पथकाने अंबाजोगाई शहरातील विविध ठिकाणी असलेल्या पाच सेवा केंद्रांची तपासणी केली. यामध्ये तहसील कार्यालयाजवळील गॅलक्सी मल्टीसर्व्हिसेस या ठिकाणी अवैधपणे केंद्र चालत असल्याचे निदर्शनास आले. विनापरवाना केंद्र चालवून सय्यद मिर मुबीन अली मिर अर्शद अली हा नागरिकांकडून जात प्रमाणपत्रासाठी ४०० ते २ हजार रुपयेपर्यंत अवाजवी रक्कम घेत असल्याचे उघड झाले. या प्रकरणी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. अमित अरुण माळी याच्या केंद्राचा मूळ परवाना जोगाईवाडी येथील असताना, प्रत्यक्षात सेवा केंद्र हे तहसील कार्यालयाजवळील इमारतीत सुरू असल्याचे आढळल्याने त्याचा परवाना रद्द करण्यात आला. बालासाहेब विष्णूदास जगताप व दत्तात्रय मोहन विर या दोन्ही केंद्रांमध्ये गंभीर त्रुटी आढळल्याने त्यांचे देखील परवाने रद्द करण्यात आले. तर आर्यन मल्टीसर्व्हिसेस हे केंद्र बंद असल्याने त्याची तपासणी होऊ शकली नाही. या तपासणी पथकात नायब तहसीलदार श्री. गायकवाड, श्रीमती स्मिता बाहेती व श्री. गणेश जिडगे यांचा समावेश होता. त्यांनी संपूर्ण अहवाल उपविभागीय अधिकारी कार्यालयाकडे सादर केला असून, अहवालाच्या आधारे पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे.




**तीन सेवा केंद्रांचे परवाने रद्द, एका अवैध केंद्र चालकावर फौजदारी गुन्हा**

## मनमानी शुल्क आकारणाऱ्यांवर होणार कठोर कारवाई : उपविभागीय अधिकारी

या कारवाईबाबत माहिती देताना उपविभागीय अधिकारी दीपक वजाळे म्हणाले, 'आपले सरकार' सेवा केंद्रामार्फत शासनाच्या विविध योजना व सेवा जनतेपर्यंत पोहोचवण्याचा हेतू आहे. मात्र काही केंद्र चालकांकडून याचा गैरफायदा घेत जनतेची फसवणूक केली जात आहे. शासनाने निश्चित केलेल्या दरांपेक्षा जादा पैसे घेणे हा गंभीर प्रकार असून अशा मनमानी करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल.

## तपासणीमुळे जनतेत समाधानाचे वातावरण

ही कारवाई भविष्यातील इतर केंद्र चालकांसाठी इशारा ठरणार असून, या केंद्रांमधून होणारी लूट थांबविण्याच्या दिशेने ही महत्त्वाची पावले उचलली गेली आहेत. या तपासणीमुळे अनेक वर्षांपासून दुर्लक्षित असलेल्या गैरप्रकारांवर प्रशासनाने कारवाई केल्याने नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. 'आमच्या कडून नेहमीच जादा पैसे घेतले जात होते. आता निदान सरकारी यंत्रणा जागी झाली,' असे स्थानिक नागरिकांनी सांगितले.

## नागरिकांना प्रशासनाचे आवाहन

आपले सरकार सेवा केंद्रातून कोणतीही सेवा घेताना शासनाने निश्चित केलेल्या दरांपेक्षा अधिक पैसे देऊ नयेत. तसेच प्रत्येक व्यवहारानंतर ऑनलाईन पावती आवश्यक आहे. कोणीही जादा रक्कम मागितल्यास तत्काळ तक्रार करावी असे प्रशासनाने सर्व नागरिकांना आवाहन केले आहे.

पान ६ वरून...

## पुर्विच्या डांबरी रोडवर

यांनी भ्रष्टाचार करत असल्याचे नागरिक एकमेकात चर्चा करत चौका - चौकात बोलत असल्याचे आढळून येत आहेत तरी सुद्धा यावरती कोणी सुद्धा आवाज उठवायला तयार नाही. याचे मुख्य कारण म्हणजे की जर आवाज उठवला तर संबंधित अधिकारी यांची प्रतिमा चांगली असल्याचे जे नागरिकांमध्ये दाखवतात व सांगतात तेच की त्यांनी ही अनेक कामे केले आहेत. त्यात सुद्धा भ्रष्टाचार करत असल्याचे नागरिक एक मेकांना सांगत असल्याची चर्चा जोर धरू लागली आहे त्या मुळे लोकप्रतिनिधींनी व जिल्हा अधिकारी यांनी याकडे लक्ष केंद्रीत करून भ्रष्टाचार मोडीत आणावा अशी धारूर शहरातील नागरिकांची मागणी आहे.

## राजर्षी शाहू महाराज

कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप योगेश्वरी शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष डॉ.सुरेश खुरसाळे यांच्या संबोधणाने झाला. सामाजिक न्यायाचे स्वप्न राजर्षी शाहू महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पाहिले होते. भेदाभेद नष्ट झाला पाहिजे अशी शाहू महाराजांची भूमिका होती.त्यांनी इ.स. १९०२ सालीच आपल्या कोल्हापूर संस्थानात पन्नास टक्के आरक्षण मागासवर्गीय समाजाला दिले होते. शाहू महाराज सामाजिक न्यायाचे प्रणेते होते असे मत त्यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर यांनी सामाजिक परिवर्तनाच्या चळवळी या परिसरातून उभ्या राहिल्या आहेत.हा वसा आम्ही पुढे चालवित आहोत असे सांगितले. या कार्यक्रमाचे संचालन महाविद्यालयातील नाट्यशास्त्र विभागातील प्रा.डॉ.ज्ञानेश्वर सोनवणे यांनी केले तर आभार प्रदर्शन पदव्युत्तर विभागाच्या संचालिका डॉ.शैलजा बरुरे यांनी केले. या कार्यक्रमाला योगेश्वरी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष गणपत व्यास गुरुजी, कार्यकारी उपाध्यक्ष ॲड.जगदीश चौसाळकर, जेष्ठ सल्लागार प्रा. माणिकराव लोमटे, संचालक डॉ.भीमाशंकर शेटे,वैद्य सर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. आर. थारकर, योगेश्वरी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एम. व्ही. कानेटकर, तंत्र निकेतन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रमण देशपांडे, डॉ. कमलाकर कांबळे, महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अंगणवाडी कार्यकर्त्या

आरोग्य केंद्र नुकत्याच झालेल्या एका समारंभात अंगणवाडी मराठवाडा संघटनेचे प्रादेशिक अध्यक्ष कमलबाई बांगर यांच्या प्रमुख उपस्थितीत चौसाळा विभागाच्या जोशी मॅडम या मान्यवरांच्या उपस्थितीत अंगणवाडीच्या परिसरातील सर्व कार्यकर्त्या यांच्या उपस्थितीत उषाबाई पंडित यांचा जाहीर सत्कार करण्यात आला उषा पंडित यांनी सत्काराप्रसंगी मला सर्व गावकऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी साथ दिल्यामुळे मी माझी ३१ वर्षे सेवा योग्य पद्धतीने करू शकले यामुळे मी ग्रामस्थांचे अंगणवाडीच्या सर्व कार्यकर्त्यांचे मी आभार मानते असे म्हटले.

## शासकीय कापुस विक्रीसाठी

आवश्यक आहे. पोस्टल बँकेमध्ये खाते असल्यास त्याची पैसे स्विकारण्याची मर्यादा वाढवलेली आवश्यक असुन याची सर्व तयारी करावी तसेच नंतर ऐनवेळी धावपळ करण्यापेक्षा व परेशान होण्यापेक्षा रिकाम्या वेळात कापूस उत्पादक शेतकरी बांधवांनी हे काम करून ठेवा म्हणजे आपला कापुस शासकीय कापुस खरेदी केंद्रावर घालता येईल.त्यामुळे वरिल सर्व प्रक्रिया आताच पुर्ण कराव्यात असे आवाहन बाजार समितीचे सभापती जयदत्त नरवडे, उपसभापती श्रीहरी मोरे,सचिव हरिभाउ सवणे यांनी केले आहे.

## शासकीय आय.टी.आय

संकटातून बाहेर काढण्याऐवजी सरकारने ते उद्योगपतींच्या घशात घालण्याचा घाट घातला आहे. त्या ऐवजी महाराष्ट्र सरकारने तुकाराम मुंडे यांच्यासारख्या कर्तव्यकठोर, प्रामाणिक अधिकाऱ्याची समिती नेमून सरकारनेच स्वतः त्या एस.टी.आगाराच्या जागेचा विकास करावा. त्यामुळे एस.टी. आर्थिक तोट्यातून बाहेर पडण्यास मदत होईल आणि खासगीकरण थांबविता येईल. कारण, यापुर्वी खासगीकरणातून विकसीत करण्यात आलेल्या एस.टी.च्या जागेचा पुर्वानुभव फारसा चांगला नसल्याचे एस.टी.च्याच अधिकाऱ्यांकडून वेळोवेळी सांगण्यात आले आहे. श्वेतपत्रिका काढून एस.टी.कशी नफ्यात आणतो आहोत हे आशेचे गाजर फसवे आहे. विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस हे जेव्हा विरोधी पक्षनेता होते. तेव्हा त्यांनी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे सरकार मध्ये विलिनीकरण करण्याची मागणी केली होती. तेच मा.देवेंद्रजी फडणवीस आता मुख्यमंत्री असताना मात्र एस.टी.महामंडळाच्या जागा ह्या विकासाच्या नांवावर उद्योगपतींना कवडीमोल किंमतीमध्ये विकण्याचा घाट घालत आहेत. हे खासगीकरण थांबविले नाही. तर बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीचे संस्थापक अध्यक्ष ॲड.डॉ.सुरेश माने साहेब यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण महाराष्ट्रामध्ये फार मोठे आंदोलन उभे करील. आणि त्याची सर्वस्वी जबाबदारी शासनाची राहील. असा इशारा बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीचे महाराष्ट्र प्रदेश सचिव ॲड.माणिक बन्सी आदमाने (अंबाजोगाई) यांनी दिला आहे. सदरील निवेदनावर ॲड.वसंत हजारे, राजाभाऊ आदमाने, भारत (मामा) होके, अमोल तरकसे, अविनाश ओव्हाळ, प्रकाश शिंदे, लक्ष्मण वाघे, विठ्ठल तरकसे, सचिन मस्के, सिध्दार्थ होके, बाळासाहेब होके, अमर होके, अशोक शिंगाडे, सुनिल होके, अमोल आदमाने, प्रमोद आदमाने आणि अरविंद आदमाने यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

---

**कार्यालय नगरपंचायत घनसावंगी जि जालना**
**प्रशासकीय इमारत, घनसावंगी**
npghansawangi@gmail.com PH.no ०२४८३-२७१७८७
जा.क्र.२०२५/नपघ/जा.प्र./कावी-१२८१
दिनांक: ३०/०६/२०२५

### जाहीर प्रगटन

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार अंकुश भिकाजी बोबडे रा.ता.जि. औरंगाबाद यांनी नामे १. बाळकृष्ण दासराव भाकरे २. देवेन बाळकृष्ण भाकरे रा.ता.जि. औरंगाबाद यांच्याकडुन रजिस्टर दस्त क्रं ३९९३ दि. १९/१२/२०२२ या खरेदीदस्ताची सत्य प्रत जोडुन आवक क्रं १९५२ दिनांक:- २७/०६/२०२५ रोजी नामांतर करण्यासाठी अर्ज सादर केला आहे. १. बाळकृष्ण दासराव भाकरे २. देवेन बाळकृष्ण भाकरे रा.ता.जि. औरंगाबाद नावावर असलेला गट नं (२३९) मधील प्लॉट नं. ३७ सि.स.नं. ज्याचा मिळकत क्रं १५७४/३७ मधील क्षेत्र ५२.९० चौ.मी नावे करणेस्तव ज्याची चतु: सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्व :- प्लॉट नं.३८
पश्चिम : प्लॉट नं.३६
दक्षिण : प्लॉट नं. ४६
उत्तरेस : ९ मिटर कॉलनी अंतर्गत रोड

या वरील चतुः सिमा मधील ५२.९० चौ.मी जागा खरेदीदस्ता आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/ आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन या कार्यालयात १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्या सह आक्षेप अर्ज दाखल करावा. नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणने नाही. असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्याने दिले आहे.

**स्वाक्षरीत**
**मुख्याधिकारी नगरपंचायत घनसांवगी**

---

**कार्यालय नगरपंचायत घनसावंगी जि जालना**
**प्रशासकीय इमारत, घनसावंगी**
npghansawangi@gmail.com PH.no ०२४८३-२७१७८७
जा.क्र.२०२५/नपघ/जा.प्र./कावी-१२८१
दिनांक: ३०/०६/२०२५

### जाहीर प्रगटन

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार अंकुश भिकाजी बोबडे रा.ता.जि. औरंगाबाद यांनी नामे १. बाळकृष्ण दासराव भाकरे २. देवेन बाळकृष्ण भाकरे रा.ता.जि. औरंगाबाद यांच्याकडुन रजिस्टर दस्त क्रं ३९८८ दि. १९/१२/२०२२ या खरेदीदस्ताची सत्य प्रत जोडुन आवक क्रं १९५२ दिनांक:- २७/०६/२०२५ रोजी नामांतर करण्यासाठी अर्ज सादर केला आहे. १. बाळकृष्ण दासराव भाकरे २. देवेन बाळकृष्ण भाकरे रा.ता.जि. औरंगाबाद नावावर असलेला गट नं (२३९) मधील प्लॉट नं. ३६ सि.स.नं. ज्याचा मिळकत क्रं १५७४/३६ मधील क्षेत्र ५२.९० चौ.मी नावे करणेस्तव ज्याची चतु: सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्व :- प्लॉट नं.३७
पश्चिम : प्लॉट नं.३५
दक्षिण : प्लॉट नं. ४७
उत्तरेस : ९ मिटर कॉलनी अंतर्गत रोड

या वरील चतुः सिमा मधील ५२.९० चौ.मी जागा खरेदीदस्ता आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/ आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन या कार्यालयात १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्या सह आक्षेप अर्ज दाखल करावा. नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणने नाही. असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्याने दिले आहे.

**स्वाक्षरीत**
**मुख्याधिकारी नगरपंचायत घनसांवगी**

---

**कार्यालय नगरपंचायत घनसावंगी जि जालना**
**प्रशासकीय इमारत, घनसावंगी**
npghansawangi@gmail.com PH.no ०२४८३-२७१७८७
जा.क्र.२०२५/नपघ/जा.प्र./कावी- १२८१
दिनांक: ३०/०६/२०२५

### जाहीर प्रगटन

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार अंकुश भिकाजी बोबडे रा.ता.जि. औरंगाबाद यांनी नामे १. बाळकृष्ण दासराव भाकरे २. देवेन बाळकृष्ण भाकरे रा.ता.जि. औरंगाबाद यांच्याकडुन रजिस्टर दस्त क्रं ३९८७ दि. १९/१२/२०२२ या खरेदीदस्ताची सत्य प्रत जोडुन आवक क्रं १९५२ दिनांक:- २७/०६/२०२५ रोजी नामांतर करण्यासाठी अर्ज सादर केला आहे. १. बाळकृष्ण दासराव भाकरे २. देवेन बाळकृष्ण भाकरे रा.ता.जि. औरंगाबाद नावावर असलेला गट नं (२३९) मधील प्लॉट नं. ३५ सि.स.नं. ज्याचा मिळकत क्रं १५७४/३५ मधील क्षेत्र ७५.२९ चौ.मी नावे करणेस्तव ज्याची चतु: सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्व :- प्लॉट नं.३६
पश्चिम : ९ मिटर कॉलनी अंतर्गत रोड
दक्षिण : प्लॉट नं. ४८
उत्तरेस : ९ मिटर कॉलनी अंतर्गत रोड

या वरील चतुः सिमा मधील ७५.२९ चौ.मी जागा खरेदीदस्ता आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/ आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन या कार्यालयात १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्या सह आक्षेप अर्ज दाखल करावा. नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणने नाही. असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्याने दिले आहे.

**स्वाक्षरीत**
**मुख्याधिकारी नगरपंचायत घनसांवगी**

---

**कार्यालय नगरपंचायत घनसावंगी जि जालना**
**प्रशासकीय इमारत, घनसावंगी**
npghansawangi@gmail.com PH.no ०२४८३-२७१७८७
जा.क्र.२०२५/नपघ/जा.प्र./कावी- १२८२
दिनांक: ३०/०६/२०२५

### जाहीर प्रगटन

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार शाम दत्तात्रय गीरी रा.ता.जि. औरंगाबाद यांनी नामे १. बाळकृष्ण दासराव भाकरे २. देवेन बाळकृष्ण भाकरे रा.ता.जि. औरंगाबाद यांच्याकडुन रजिस्टर दस्त क्रं १३९१ दि. १०/०५/२०२३ या खरेदीदस्ताची सत्य प्रत जोडुन आवक क्रं १९५३ दिनांक:- २७/०६/२०२५ रोजी नामांतर करण्यासाठी अर्ज सादर केला आहे. १. बाळकृष्ण दासराव भाकरे २. देवेन बाळकृष्ण भाकरे रा.ता.जि. औरंगाबाद नावावर असलेला गट नं (२३९) मधील प्लॉट नं. १३ सि.स.नं. ज्याचा मिळकत क्रं १५७४/१३ मधील क्षेत्र ६२.०४ चौ.मी नावे करणेस्तव ज्याची चतु: सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्व :- ९ मीटर कॉलनी अंतर्गत रोड
पश्चिम : गट नं. २३९मधील जमीन
दक्षिण : प्लॉट नं. १२
उत्तरेस : प्लॉट नं. १४

या वरील चतुः सिमा मधील ६२.०४ चौ.मी जागा खरेदीदस्ता आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/ आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन या कार्यालयात १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्या सह आक्षेप अर्ज दाखल करावा. नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणने नाही. असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्याने दिले आहे.

**स्वाक्षरीत**
**मुख्याधिकारी नगरपंचायत घनसांवगी**

---

**कार्यालय नगरपंचायत घनसावंगी जि जालना**
**प्रशासकीय इमारत, घनसावंगी**
npghansawangi@gmail.com PH.no ०२४८३-२७१७८७
जा.क्र.२०२५/नपघ/जा.प्र./कावी- १२८२
दिनांक: ३०/०६/२०२५

### जाहीर प्रगटन

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार शाम दत्तात्रय गीरी रा.ता.जि. औरंगाबाद यांनी नामे १. बाळकृष्ण दासराव भाकरे २. देवेन बाळकृष्ण भाकरे रा.ता.जि. औरंगाबाद यांच्याकडुन रजिस्टर दस्त क्रं १३९२ दि. १०/०५/२०२३ या खरेदीदस्ताची सत्य प्रत जोडुन आवक क्रं १९५३ दिनांक:- २७/०६/२०२५ रोजी नामांतर करण्यासाठी अर्ज सादर केला आहे. १. बाळकृष्ण दासराव भाकरे २. देवेन बाळकृष्ण भाकरे रा.ता.जि. औरंगाबाद नावावर असलेला गट नं (२३९) मधील प्लॉट नं. १४ सि.स.नं. ज्याचा मिळकत क्रं १५७४/१४ मधील क्षेत्र ६२.०८ चौ.मी नावे करणेस्तव ज्याची चतु: सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्व :- ९ मीटर कॉलनी अंतर्गत रोड
पश्चिम : गट नं. २३९मधील जमीन
दक्षिण : प्लॉट नं. १३
उत्तरेस : प्लॉट नं. १५

या वरील चतुः सिमा मधील ६२.०८ चौ.मी जागा खरेदीदस्ता आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/ आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन या कार्यालयात १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्या सह आक्षेप अर्ज दाखल करावा. नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणने नाही. असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्याने दिले आहे.

**स्वाक्षरीत**
**मुख्याधिकारी नगरपंचायत घनसांवगी**

---

**कार्यालय नगरपंचायत घनसावंगी जि जालना**
**प्रशासकीय इमारत, घनसावंगी**
npghansawangi@gmail.com PH.no ०२४८३-२७१७८७
जा.क्र.२०२५/नपघ/जा.प्र./कावी- १२८२
दिनांक: ३०/०६/२०२५

### जाहीर प्रगटन

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार शाम दत्तात्रय गीरी रा.ता.जि. औरंगाबाद यांनी नामे १. बाळकृष्ण दासराव भाकरे २. देवेन बाळकृष्ण भाकरे रा.ता.जि. औरंगाबाद यांच्याकडुन रजिस्टर दस्त क्रं १३९३ दि. १०/०५/२०२३ या खरेदीदस्ताची सत्य प्रत जोडुन आवक क्रं १९५३ दिनांक:- २७/०६/२०२५ रोजी नामांतर करण्यासाठी अर्ज सादर केला आहे. १. बाळकृष्ण दासराव भाकरे २. देवेन बाळकृष्ण भाकरे रा.ता.जि. औरंगाबाद नावावर असलेला गट नं (२३९) मधील प्लॉट नं. १५ सि.स.नं. ज्याचा मिळकत क्रं १५७४/१५ मधील क्षेत्र ९९.५८ चौ.मी नावे करणेस्तव ज्याची चतु: सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्व :- ९ मीटर कॉलनी अंतर्गत रोड
पश्चिम : गट नं. २३९मधील जमीन
दक्षिण : प्लॉट नं. १४
उत्तरेस : रोहाऊस नंबर ०१

या वरील चतुः सिमा मधील ९९.५८ चौ.मी जागा खरेदीदस्ता आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/ आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन या कार्यालयात १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्या सह आक्षेप अर्ज दाखल करावा. नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणने नाही. असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्याने दिले आहे.

**स्वाक्षरीत**
**मुख्याधिकारी नगरपंचायत घनसांवगी**

---

**कार्यालय नगरपंचायत घनसावंगी जि जालना**
**प्रशासकीय इमारत, घनसावंगी**
npghansawangi@gmail.com PH.no ०२४८३-२७१७८७
जा.क्र.२०२५/नपघ/जा.प्र./कावी- १२८२
दिनांक: ३०/०६/२०२५

### जाहीर प्रगटन

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार शाम दत्तात्रय गीरी रा.ता.जि. औरंगाबाद यांनी नामे १. बाळकृष्ण दासराव भाकरे २. देवेन बाळकृष्ण भाकरे रा.ता.जि. औरंगाबाद यांच्याकडुन रजिस्टर दस्त क्रं १३९० दि. १०/०५/२०२३ या खरेदीदस्ताची सत्य प्रत जोडुन आवक क्रं १९५३ दिनांक:- २७/०६/२०२५ रोजी नामांतर करण्यासाठी अर्ज सादर केला आहे. १. बाळकृष्ण दासराव भाकरे २. देवेन बाळकृष्ण भाकरे रा.ता.जि. औरंगाबाद नावावर असलेला गट नं (२३९) मधील प्लॉट नं. १२ सि.स.नं. ज्याचा मिळकत क्रं १५७४/१२ मधील क्षेत्र ६२.०० चौ.मी नावे करणेस्तव ज्याची चतु: सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्व :- ९ मीटर कॉलनी अंतर्गत रोड
पश्चिम : गट नं. २३९मधील जमीन
दक्षिण : प्लॉट नं. ११
उत्तरेस : प्लॉट नं. १३

या वरील चतुः सिमा मधील ६२.०० चौ.मी जागा खरेदीदस्ता आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/ आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन या कार्यालयात १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्या सह आक्षेप अर्ज दाखल करावा. नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणने नाही. असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्याने दिले आहे.

**स्वाक्षरीत**
**मुख्याधिकारी नगरपंचायत घनसांवगी**

---

**कार्यालय नगरपंचायत घनसावंगी जि जालना**
**प्रशासकीय इमारत, घनसावंगी**
npghansawangi@gmail.com PH.no ०२४८३-२७१७८७
जा.क्र.२०२५/नपघ/जा.प्र./कावी- १२८२
दिनांक: ३०/०६/२०२५

### जाहीर प्रगटन

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार शाम दत्तात्रय गीरी रा.ता.जि. औरंगाबाद यांनी नामे १. बाळकृष्ण दासराव भाकरे २. देवेन बाळकृष्ण भाकरे रा.ता.जि. औरंगाबाद यांच्याकडुन रजिस्टर दस्त क्रं १३८९ दि. १०/०५/२०२३ या खरेदीदस्ताची सत्य प्रत जोडुन आवक क्रं १९५३ दिनांक:- २७/०६/२०२५ रोजी नामांतर करण्यासाठी अर्ज सादर केला आहे. १. बाळकृष्ण दासराव भाकरे २. देवेन बाळकृष्ण भाकरे रा.ता.जि. औरंगाबाद नावावर असलेला गट नं (२३९) मधील प्लॉट नं. ११ सि.स.नं. ज्याचा मिळकत क्रं १५७४/११ मधील क्षेत्र ६१.९६ चौ.मी नावे करणेस्तव ज्याची चतु: सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्व :- ९ मीटर कॉलनी अंतर्गत रोड
पश्चिम : गट नं. २३९मधील जमीन
दक्षिण : प्लॉट नं. १०
उत्तरेस : प्लॉट नं. १२

या वरील चतुः सिमा मधील ६१.९६ चौ.मी जागा खरेदीदस्ता आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/ आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन या कार्यालयात १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्या सह आक्षेप अर्ज दाखल करावा. नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणने नाही. असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्याने दिले आहे.

**स्वाक्षरीत**
**मुख्याधिकारी नगरपंचायत घनसांवगी**

---

**कार्यालय नगरपंचायत घनसावंगी जि जालना**
**प्रशासकीय इमारत, घनसावंगी**
npghansawangi@gmail.com PH.no ०२४८३-२७१७८७
जा.क्र.२०२५/नपघ/जा.प्र./कावी- १२८२
दिनांक: ३०/०६/२०२५

### जाहीर प्रगटन

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार शाम दत्तात्रय गीरी रा.ता.जि. औरंगाबाद यांनी नामे १. बाळकृष्ण दासराव भाकरे २. देवेन बाळकृष्ण भाकरे रा.ता.जि. औरंगाबाद यांच्याकडुन रजिस्टर दस्त क्रं १३८८ दि. १०/०५/२०२३ या खरेदीदस्ताची सत्य प्रत जोडुन आवक क्रं १९५३ दिनांक:- २७/०६/२०२५ रोजी नामांतर करण्यासाठी अर्ज सादर केला आहे. १. बाळकृष्ण दासराव भाकरे २. देवेन बाळकृष्ण भाकरे रा.ता.जि. औरंगाबाद नावावर असलेला गट नं (२३९) मधील प्लॉट नं. १० सि.स.नं. ज्याचा मिळकत क्रं १५७४/१० मधील क्षेत्र ९९.२४ चौ.मी नावे करणेस्तव ज्याची चतु: सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्व :- ९ मीटर कॉलनी अंतर्गत रोड
पश्चिम : गट नं. २३९मधील जमीन
दक्षिण : प्लॉट नं. ०९
उत्तरेस : प्लॉट नं. ११

या वरील चतुः सिमा मधील ९९.२४ चौ.मी जागा खरेदीदस्ता आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/ आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन या कार्यालयात १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्या सह आक्षेप अर्ज दाखल करावा. नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणने नाही. असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्याने दिले आहे.

**स्वाक्षरीत**
**मुख्याधिकारी नगरपंचायत घनसांवगी**

---

**कार्यालय नगरपंचायत घनसावंगी जि. जालना**
**प्रशासकीय इमारत, घनसावंगी**
npghansawangi@gmail.com PH.no ०२४८३-२७१७८७
जा.क्र.२०२५/नपघ/जा.प्र./कावी-१२८१
दिनांक: ३०/०६/२०२५

### जाहीर प्रगटन

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार अंकुश भिकाजी बोबडे रा.ता.जि. औरंगाबाद यांनी नामे १. बाळकृष्ण दासराव भाकरे २. देवेन बाळकृष्ण भाकरे रा.ता.जि. औरंगाबाद यांच्याकडुन रजिस्टर दस्त क्रं ३९८९ दि. १९/१२/२०२२ या खरेदीदस्ताची सत्य प्रत जोडुन आवक क्रं १९५२ दिनांक:- २७/०६/२०२५ रोजी नामांतर करण्यासाठी अर्ज सादर केला आहे. १. बाळकृष्ण दासराव भाकरे २. देवेन बाळकृष्ण भाकरे रा.ता.जि. औरंगाबाद नावावर असलेला गट नं (२३९) मधील प्लॉट नं. ३८ सि.स.नं. ज्याचा मिळकत क्रं १५७४/३८ मधील क्षेत्र ५२.९० चौ.मी नावे करणेस्तव ज्याची चतु: सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्व :- प्लॉट नं.३९
पश्चिम : प्लॉट नं.३७
दक्षिण : प्लॉट नं. ४५
उत्तरेस : ९ मिटर कॉलनी अंतर्गत रोड

या वरील चतुः सिमा मधील ५२.९० चौ.मी जागा खरेदीदस्ता आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/ आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन या कार्यालयात १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्या सह आक्षेप अर्ज दाखल करावा. नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणने नाही. असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्याने दिले आहे.

**स्वाक्षरीत**
**मुख्याधिकारी नगरपंचायत घनसांवगी**

cmyk

# सासवडमध्ये वारकऱ्यांना महिला शेतकऱ्यांकडून पुरणपोळीचे गोड जेवण

पुरंदर : शेतीच्या कामाच्या व्यापामुळे अनेक महिला शेतकऱ्यांना मनात इच्छा असूनही विठुरायाच्या भेटीसाठी वारीत जाता येत नाही; परंतु तीनशे किलोमीटर अंतरावरील सासवड (ता. पुरंदर, जि. पुणे) येथील दिंडीत सहभागी झालेल्या सुमारे सहा हजार वारकऱ्यांना पुरणपोळीचे गोड जेवण देण्याची सेवा सारदे (ता. बागलाण) येथील शेतकरी महिलांनी गेल्या ४१ वर्षांपासून जपली आहे. विठुरायावरील आपली अनोखी निस्सीम भक्ती पंचक्रोशीत चर्चेचा विषय बनली आहे.

वारी ही महाराष्ट्रातील एक धार्मिक व सांस्कृतिक परंपरा आहे. वैकुंठवासी गुरुवर्य गोविंद महाराज केंद्रे बाबा यांनी सुरू केलेली दिंडी माउलींच्या पालखी सोहळ्यातील दिंडी प्रसिद्ध आहे. विष्णू महाराज केंद्रे दिंडीचा समृद्ध वारसा अनेक वर्षांपासून जपत आहेत. ही दिंडी ज्येष्ठ कृष्ण द्वादशीला सासवडला मुक्कामी असते. एकादशीचा उपवास सोडण्यासाठी सारदे येथून पुरणपोळ्यांनी भरलेली पिकअप सासवडकडे रवाना झाली होती. संत ज्ञानेश्वर महाराज, संत



सोपानदेव यांना बहीण मुक्ताबाईने सोपानदेवांच्या सासवड नगरीत पुरणपोळी खाऊ घातली होती. त्यामुळे पुरणपोळीच्या पाहुणचाराची परंपरा सुरू ठेवून सारदेकरांनी अनोखा भक्तिभाव जपला आहे. दरवर्षी नियोजनाप्रमाणे द्वादशीला दुपारचे जेवण पुरणपोळी (मांडे) व आमरसाचा स्वाद वारकरी घेतात. दरवर्षी समस्त ग्रामस्थ भजनी मंडळ, सारदे यांच्या सहकार्याने संपूर्ण गावातील महिला यात सहभागी होऊन आपापल्या घरातून पुरणपोळी बनवून गावातील राम मंदिरात जमा करतात. द्वादशीला सासवड येथे दुपारपर्यंत पोहोचून संपूर्ण दिंडीला मांडे भोजनाचे जेवण स्वतः वाढून कार्य सिद्धीस नेतात.पूर्वी वैकुंठवासी गोविंद महाराज केंद्रे बाबांच्या वारीमध्ये गावातील महिला आणि पुरुष सहभागी होत असत. गावात प्रवचनासाठी आले असताना गोविंद महाराजांना पुरणपोळीचे जेवण देण्यात आले.त्यावेळी त्यांनी असे जेवण वारीत मिळाले तर किती छान होईल, असे सहज सांगितले. त्यानंतर वारीत सहभागी होणाऱ्या महिला खापर आणि पुरणपोळीसाठी लागणारे साहित्य घेत सहभागी होत असत. मात्र वारकऱ्यांची संख्या आणि मांडे तयार करणाऱ्या महिला हे सूत्र जमत नव्हते. शेवटी भजनी मंडळाच्या सदस्य गावातच आदल्या रात्री मांडे तयार करून सासवड येथे थेट वाहनाने पोहोच करु लागले. गेल्या चाळीस वर्षांपासून अखंडपणे पुरणपोळीची परंपरा सुरू आहे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६९८ : थॉमस सावेरी यांनी पहिले स्टीम इंजिन चे पेटंट मिळवले.
१८५० : बेंजामिन लेन या शास्त्रज्ञाला 'गॅस मास्क'चे अनेरिकन पेटंट बहाल
१८६२ : कलकत्ता येथील उच्च न्यायालयाची स्थापना उच्च न्यायालयीन कायदा १८६१ अंतर्गत करण्यात आली.
१८६५ : 'साल्व्हेशन आर्मी' या सेवाभावी संस्थेची स्थापना
१९४० : सुभाषचंद्र बोस यांना कलकत्ता येथे स्थानबद्ध करण्यात आले.
१९६२ : रॉजर्स, आरकॅन्सास येथे पहिले 'वॉल मार्ट' स्टोअर उघडले.
१९७२ : भारताच्या पंतप्रधान इंदिरा गांधी आणि पाकिस्तानचे पंतप्रधान झुल्फिकार अली भुट्टो यांनी सिमला करारावर स्वाक्षर्‍या केल्या.
१९८३ : कल्पक्कम, तामिळनाडू येथील अणूऊर्जा केंद्र सुरू झाले.
१९९४ : चित्रकार जगदीश स्वामीनाथन यांची मध्यप्रदेश सरकारच्या कालिदास सन्मानासाठी निवड
२००१ : बिहारमधील चंपारण्य जिल्हयातील केसरिया गाव येथे ०४ फूट उंचीचा जगातील सर्वात मोठा बौध्द स्तूप सापडला.
२००२ : स्टीव फॉसेट हा उष्ण हवेच्या फुग्याद्वारे पृथ्वी प्रदक्षिणा करणारा सर्वप्रथम व्यक्ती झाला.
२००४ : युनेस्कोच्या जागतिक वारसा समितीने मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस स्टेशनला जागतिक वारसा स्थळाच्या यादीत समाविष्ट केलं.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८६२ : नोबेल पारितोषिक विजेते इंग्लिश भौतिकशास्त्रज्ञ विल्यम हेन्री ब्रॅग यांचा जन्म.
१८७७ : नोबेल पारितोषिक विजेते जर्मन लेखक हेर्मान हेस यांचा जन्म.
१८८० : गणेश गोविंद तथा 'गणपतराव' बोडस नट व गायक, 'गंधर्व नाटक मंडळी'चे एक संस्थापक (मृत्यू: २३ डिसेंबर १९६५)
१८९३ : स्वतंत्र भारतातील पंजाब राज्याचे पहिले राज्यपाल व आंध्रप्रदेश राज्याच्या स्थापने नंतरचे आंध्रप्रदेश राज्याचे पहिले राज्यपाल चंदूलाल माधवलाल त्रिवेदी यांचा जन्मदिन.
१९०४ : रेने लॅकॉस्त फ्रेन्च लॉन टेनिस खेळाडू आणि 'पोलो' टी शर्टचे जनक (मृत्यू: १२ आक्टोबर १९९६)
१९०६ : नोबल पुरस्कार विजेते अमेरिकन भौतिकीतज्ञ बेटे हान्स आल्ब्रेख्ट यांचा जन्म.
१९२२ : पिअर कार्डिन फ्रेन्च फॅशन डिझायनर
१९२३ : जवाहरलाल अमोलकचंद दर्डा स्वातंत्र्यसैनिक व राजकारणी (मृत्यू:)
१९२५ : पॅट्रिक लुमूंबा कॉंगोचे पहिले पंतप्रधान (मृत्यू: १७ जानेवारी १९६१)
१९२६ : विनोदी लेखक वि. आ. तथा विनायक आदिनाथ बुवा यांचा जन्म.
१९३० : कार्लोस मेनेम अर्जेंटिनाचे ५० वे राष्ट्राध्यक्ष
१९४६ : प्रसिद्ध भारतीय लेखक, पत्रकार व साहसी कादंबरीकार अरुपकुमार दत्त यांचा जन्मदिन.
१९५४ : प्रसिद्ध भारतीय चित्रपट पार्श्वगायक मुहम्मद अझीज यांचा जन्मदिन.
१९६० : हिंदुस्थानी शास्त्रीय परंपरेतील प्रसिद्ध लखनऊ तबला घराण्याची शाखा असलेल्या जोशी जोशी घराण्याचे सदस्य भारतीय गायक पंडित संतोष जोशी यांचा जन्मदिन.
१९८३ : भारतीय व्यावसायिक पॅरा-बॅडमिंटनपटू व उत्तरप्रदेश राज्यातील गौतमबुद्ध नगरचे जिल्हा दंडाधिकारी सुहास ललीनाकेरे यथिराज यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१५६६ : नोट्रे डॅम प्रसिद्ध फ्रेंच ज्योतिषी, गणितज्ञ व भविष्यवेत्ता (जन्म: १४ डिसेंबर १५०३)
१७७८ : रुसो फ्रेन्च विचारवंत, लेखक व संगीतकार (जन्म: २८ जून १७१२)
१८४३ : डॉ. सॅम्यूअल हानेमान होमिओपाथी या वैद्यकीय उपचारपद्धतीचे जनक (जन्म: १० एप्रिल १७५५)
१९५० : युसूफ मेहेर अली समाजवादी नेते, स्वातंत्र्यसैनिक व मुंबईचे महापौर (जन्म: २३ सप्टेंबर १९०३)
१९६१ : नोबेल पारितोषिक विजेते अमेरिकन लेखक अर्नेस्ट हेमिंग्वे यांनी आत्महत्या केली (जन्म: २१ जुलै १८९९)
१९९९ : मारिओ पुझो अमेरिकन लेखक (जन्म: १५ आक्टोबर १९२०)
२००७ : दिलीप सरदेसाई क्रिकेटपटू (जन्म: ८ ऑगस्ट १९४०)
२०११ : चतुरानन मिश्रा केंद्रीय कृषी मंत्री, कामगार नेते, कम्युनिस्ट पक्षाचे नेते (जन्म: ७ एप्रिल १९२५)
२०१३ : कॉम्पुटर माउस चे शोधक डगलस एंगलबर्ट यांचे निधन. (जन्म: ३० जानेवारी १९२५)

# शेतकऱ्यांनो, डांगी गाय देते ८०० लिटर दूध



शेतकरी बांधवांकडे त्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी अनेक प्रकारचे उत्तम प्राणी आहेत, ज्यामुळे त्यांना दर महिन्याला चांगले उत्पन्न मिळू शकते. डांगी गाय, जी आजच्या काळात इतर प्राण्यांपेक्षा जास्त नफा कमावते. भारतीय बाजारपेठेतही त्याची मागणी सर्वाधिक आहे ही गाय मूळ जातीची डांगी आहे, जी गुजरातमधील डांग, महाराष्ट्रातील ठाणे, नाशिक, अहमदनगर आणि हरियाणातील कर्नाल आणि रोहतकमध्ये अधिक आढळते. ही गाय वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या नावांनी ओळखली जाते. उदाहरणार्थ, गुजरातमध्ये ही गाय डांग म्हणून ओळखली जाते. ही गाय इतर प्राण्यांच्या तुलनेत अधिक वेगाने काम करते, असे शेतकरी व पशुपालकांचे म्हणणे आहे. याशिवाय ही गुरे अतिशय शांत आणि शक्तिशाली असतात.

या देशी गायीची सरासरी दूध काढण्याची क्षमता एका बायंटमध्ये सुमारे ४३० लिटर दूध देते आणि दुसरीकडे डांगी गायीची काळजी घेतल्यास सुमारे ८०० लिटरपर्यंत दूध मिळू शकते. जर तुम्हाला ही गाय ओळखता येत नसेल तर घाबरू नका, यासाठी तुम्हाला काही गोष्टी लक्षात ठेवाव्या लागतील. डांगी गायीची सरासरी उंची ११३ सेमी असते आणि या जातीच्या बैलाची उंची ११७ सेमी पर्यंत असते. त्यांचा रंग पांढरा असून त्यांच्या शरीरावर लाल किंवा काळे डाग दिसतील. दुसरीकडे, जर आपण त्यांच्या शिंगांबद्दल बोललो, तर त्यांची शिंगे लहान आहेत, म्हणजे १२ ते १५ सेमी आणि टोकदार टोकांसह जाड. डांगी गाईची कातडी पाहिल्यास ती अतिशय चमकदार आणि मऊ असते. त्याच्या त्वचेवर भरपूर केस आहेत. त्यांचे कान आकाराने लहान असून ते आतून काळ्या रंगाचे असतात.

# कमी खर्चात चिबड, क्षारपड जमीन सुधारण्याचे तंत्र

कोणत्याही राज्याच्या तुलनेत महाराष्ट्रात भारी आणि काळ्या जमिनीचे प्रमाण खूप जास्त आहे. आणि अशा भारी, काळ्या जमिनीमध्येच क्षार आणि पाण्याच प्रमाण वाढून सुपीक जमिनी क्षारपड-पाणथळ होऊन नापिक होण्याच प्रमाण वाढल आहे. ही समस्या प्रामुख्याने ऊस पट्ट्यात दिसून येते. अशी क्षारपड जमीन भूमिगत सच्छिद्र पाइप निचरा पद्धतीने सुधारता येते.

पश्चिम महाराष्ट्रातील सांगली, कोल्हापूर, सातारा, सोलापूर, पुणे, नगर आणि मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, परभणी, नांदेड आणि विदर्भात वर्धा, अमरावती, अकोला जिल्ह्यात क्षारपड जमिनीच प्रमाण वाढत आहे. क्षारपड जमिनीमुळे ऊस उत्पादन हेक्टरी ५० ते ६० टनांपर्यंत कमी झालेल आहे. त्यामुळे अशा जमिनीत पीक घेणे परवडणार नाही.

भूमिगत सच्छिद्र पाइप निचरा तंत्रज्ञान : भूमिगत सच्छिद्र पाइप निचरा तंत्रज्ञान हे खूप काही अवघड अशी पद्धत नाही. या पद्धतीत क्षारपड जमिनीत सच्छिद्र पाईप गाडून या पाईपवाटे शेतातील क्षारयुक्त पाणी गोळा करुन शेताबाहेर काढल जात. त्यासाठी सुरुवातीला क्षारपड जमिनीत ०.९ ते दीड मीटर खोलीचे चर काढले जातात. त्यात च्छीद्र असलेले पीव्हीसी निचरा



पाइप गाडले जातात. पाईप गाडण्यापुर्वी या पाईपभोवती गाळण म्हणजेच फिल्टर म्हणून ७.५ ते १० सेंमी जाडीचा कराळा किंवा चाळ वाळूचा थर किंवा सिंथेटिक फिल्टर गुंडाळून जमिनीमध्ये विशिष्ट उतार देऊन गाडले जातात. या मुख्य पाईपला लॅटरल पाइप, कलेक्टर पाइप, सबमेन पाइप जोडले जातात. पिकांच्या मुळांजवळचे क्षार आणि जास्तीचे पाणी मातीतून पाझरून पहिल्यांदा लॅटरल पाइपमध्ये येईल अशा पद्धतीने च्छीद्र असलेले लॅटरल पाइप, कलेक्टर पाइप, सबमेन पाइप आणि मेन पाइप एकमेकांना जोडावेत. लॅटरल पाइपमधून वाहत येणारे पाणी आणि क्षार कलेक्टर पाइपमध्ये येऊन कलेक्टर पाइपमधून सबमेन आणि मेन पाइपवाटे शेवटी नैसर्गिक ओढा, नाला किंवा नदीमध्ये सोडावे. ज्या ठिकाणी नदी, नाले ओढे नसतील अशाठिकाणी मेन पाईप मधून निचरा होणारे पाणी विहीर किंवा तलावामध्ये साठवून उपसा करून शेताबाहेर काढले पाहिजे.किती खर्च येतो? : या भूमिगत सच्छिद्र पाइप निचरा पद्धतीसाठी हेक्टरी दीड ते अडीच लाख रुपये खर्च येतो. हा खर्च जास्त वाटत असला तरी एकदाच अशी व्यवस्था करुन ठेवली तर पुढे कमीत कमी २५ वर्षापर्यंत फायदा होत राहतो. त्यामुळे या पद्धतीसाठी प्रति हेक्टरी प्रति वर्ष ६ ते १० हजार रुपये खर्च येतो.

# सुधारीत तंत्राने शेवगा लागवड

महाराष्ट्रात ८० टक्क्यांपेक्षा जास्त क्षेत्र कोरडवाहू आहे. बऱ्याचशा जमिनी हलक्या आणि नापिक म्हणून पडून आहेत. शेवगा पीक पावसाच्या पाण्यावर येणारे असल्यामुळे अशा जमिनीत शेवगा लागवड फायदेशीर ठरते. हमखास उत्पन्न देणारे पीक म्हणून शेवगा पीक ओळखले जाते. शेवगा झाडांची विशेषतः घराभोवती किंवा शेताच्या बांधावर घरगुती वापरासाठी लागवड केली जाते. आहारात शेवग्याच्या शेंगाचा आवडीने वापर केला जातो. शेवग्यामध्ये अनेक औषधी गुणधर्म असतात. शेवग्याचे मूळ, फूल, पाने व साल यांचा वापर आयुर्वेदिक औषध निर्मितीत केला जातो. त्यामुळे बाजारपेठेत त्याची मागणी दिवसेंदिवस वाढत आहे. आधुनिक तंत्राने शेवग्याची व्यापारी तत्त्वावर लागवड नक्कीच फायदेशीर ठरू शकते.

महत्त्वाच्या बाबी : शेवग्याच्या शेंगांची लांबी साधारण ५० ते ६० सेंमी असावी. त्यात भरपूर गर असावा. कडवट चव असणाऱ्या शेंगाना जास्त बाजारभाव मिळत नाही.

शेंगा काढल्यानंतर त्याचा तजेला २ ते ३ दिवस टिकून राहणे अपेक्षित असते. बऱ्याच वेळा शेंगा लवकर पोचट होतात. दोन्ही हंगामात भरपूर शेंगा देणारे असे शेवग्याचे झाड निवडून त्याच्या फाटे वापरून लागवड केल्यास चांगले उत्पादन देणारा वाण मिळण्यास मदत होते.

लागवडीसाठी जाती : तामिळनाडू कृषी विश्वविद्यालय, कोइमतूर या संस्थेने कोइमतूर-१, कोइमतूर -२, पी.के.एम.- १ आणि पी. के. एम.-२ या लवकर शेंगा येणारे व भरपूर प्रथिने असलेले वाण प्रसारित केले आहेत. दापोली येथील बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाने 'कोकण रुचिरा' हे वाण प्रसारित केले आहे. या जातीचे झाडे ५ ते ६ मीटर उंच असून साधारण १६ ते २२ फांद्या असतात. तसेच बागलकोट (कर्नाटक) येथील विद्यापीठाने 'भाग्या' ही जात चांगल्या उत्पादनासाठी विकसित केली आहे.

जमीन व हवामान : शेवगा पीक कोणत्याही हवामानात वाढू शकते. लागवड अत्यंत हलक्या



ते भारी जमिनीत करता येते. पावसाचे प्रमाण चांगले असलेल्या डोंगर उतारावरील हलक्या जमिनीमध्ये शेवगा चांगला येतो. कोकणातील शेवगा लागवड ही फक्त पावसाच्या पाण्यावर अवलंबून असलेली दिसून येते. तर पश्चिम महाराष्ट्रातील जमिनीत झाडे कोरडवाहूच आढळतात. तसेच मराठवाडा आणि विदर्भातील भारी काळ्या जमिनीत झाडे उंच वाढतात, पानांची वाढ जास्त असते. झाडांना ताण चांगला बसत नाही. त्यामुळे फुलांचे आणि शेंगांचे प्रमाण कमी होते.

लागवड : पावसाळ्यापूर्वी ६० सेंमी लांब, रुंद आणि खोल खड्डे काढावेत. खड्डे चांगली माती, कुजलेले शेणखत १ घमेले, १५:१५:१५ हे खत २५० ग्रॅम आणि ट्रायकोडर्मा ५० ग्रॅम यांच्या मिश्रणाने भरून घ्यावेत. व्यापारी तत्त्वावर शेवगा लागवड करावयाची असल्यास, दोन झाडांत व ओळींत अडीच ते ३ मीटर अंतर राखावे. शेवग्याची अभिवृद्धी फाटे कलम व बियांपासून रोपे तयार करून केली जाते. परंतु, बियांपासून लागवड केल्यास मातृवृक्षाप्रमाणे गुणधर्म असलेली झाडे मिळत नाहीत. फाटे कलमांच्या तुलनेत बिया लागवडीपासून तयार केलेल्या झाडांना ३ ते ४ महिने उशिरा शेंगा लागतात. फाटे कलमापासून लागवडीसाठी ५ ते ६ सेंमी जाडीच्या सुमारे १ ते १.२५ मीटर लांबीच्या फांद्या वापरतात.

लागवड हंगाम : कमी पावसाच्या प्रदेशात जून- जुलै महिन्यात पहिल्या पावसानंतर वातावरणात अनुकूल बदल होतात. हवेतील आर्द्रता वाढते. असे वातावरण फाटे कलम फुटण्यास किंवा रोपे रुजण्यास अनुकूल असते. त्यामुळे या काळात लागवड करणे फायदेशीर ठरते. फाटे कलम किंवा रोपे लावल्यावर त्याजवळील माती पायाने चांगली दाबावी व हातपाणी द्यावे. लागवडीनंतर ६ ते ८ महिने आवश्यकतेनुसार पाणी देऊन झाडे जगवावीत. सिंचनासाठी ठिबक सिंचन पद्धतीचा वापर देखील करता येतो. झाडाच्या प्रत्येक खड्ड्यात २ ते ३ लिटर पाणी बसेल अशा क्षमतेचे मडके जमिनीत गळ्यापर्यंत गाडावे. त्यामध्ये ५ ते ६ दिवसांच्या अंतराने पाणी टाकावे. मडक्याच्या तळाशी लहान छिद्र आणि त्यात कापडाची लहान चिंधी घातलेली असावी. आंतरपीक म्हणूनही शेवगा लागवड करता येते. आंबा, चिकू, जांभूळ व फणस इत्यादी फळपिकांच्या लागवडीमध्ये पहिली ५ ते ६ वर्ष आंतरपीक म्हणून शेवगा घेता येतो.

लागवडीनंतर घ्यावयाची काळजी : शेवगा लागवडीनंतर आंतरमशागत, प्रमाणित खतांचा वापर, झाडाची योग्य छाटणी या बाबींची योग्य काळजी घेणे आवश्यक आहे. शेवगा लागवडीत विशेष आंतरमशागत करावी लागत नाही. मात्र, झाडांची आळी वेळोवेळी खुरपून तण काढून स्वच्छ करावीत. दोन झाडांच्या ओळीत वखरणी करावी. म्हणजे तणांचा उपद्रव होणार नाही. शिवाय पावसाचे पाणी जमिनीत मुरले जाते. दरवर्षी प्रत्येक झाडास पावसाच्या सुरवातीस १० किलो शेणखत, ७५ ग्रॅम नत्र (१६५ ग्रॅम युरिया), ५० ग्रॅम स्फुरद (३१२ ग्रॅम सुपर फॉस्फेट) व ७५ ग्रॅम पालाश (१२० ग्रॅम म्युरेट ऑफ पोटॅश) याप्रमाणे रासायनिक खतमात्रा द्यावी.छाटणी : शेवग्याचे झाड झपाट्याने वाढणारे असल्यामुळे झाडांना आकार देणे आवश्यक आहे. व्यवस्थित आकार न दिल्यास झाड उंच वाढते. त्यामुळे शेंगा काढणे अवघड होऊन जाते. लागवडीनंतर २ ते अडीच महिने किंवा मुख्य खोड ३ ते ४ फूट झाल्यानंतर पहिली छाटणी करावी. यावेळी खोड जमिनीपासून १ मीटर अंतरावर छाटावे. चार दिशांना चार फांद्या वाढू द्याव्यात. यामुळे झाडांची उंची कमी होऊन शेंगा काढणे सोपे जाते. त्यानंतर ३ ते ४ महिन्यांनी चारही फांद्या मुख्यः खोडापासून एक मीटर अंतरावर छाटाव्यात. त्यामुळे झाडाचा मुख्यः आराखडा तयार होण्यास मदत होते. तसेच झाडाची उंची कमी होऊन शेंगा काढणे सोपे होते. त्यानंतर पुढे दर दोन वर्षांनी एप्रिल-मे महिन्यात शेंगा निघाल्यावर छाटणी करावी. म्हणजे झाड नियमित उत्पादन देईल.

# धान खरेदी गैरव्यवहारातील प्रादेशिक व्यवस्थापक बडतर्फ

आदिवासी विकास महामंडळातील पालघर येथील धान खरेदीत अपहार केल्याप्रकरणी तत्कालीन प्रादेशिक व्यवस्थापक विजय गांगुर्डे यांना महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालिका लीना बनसोड यांनी सेवेतून बडतर्फ केले आहे. त्यांच्याकडे एकूण २८ कोटींची वसुली करण्याचे आदेशही त्यांनी दिले.

जव्हार येथील प्रादेशिक कार्यालयात गांगुर्डे हे प्रादेशिक व्यवस्थापकपदावर कार्यरत होते. आधारभूत धान्य खरेदींतर्गत २०२२-२३ मध्ये शहापूर येथील उपप्रादेशिक कार्यालयांतर्गत पडशीळ, साकडा, न्याहाडी, खांडस या आधारभूत धान्य खरेदी केंद्रांवरील खरेदीत गैरव्यवहार झाला होता. त्यात ८६ हजार ६३४ क्विंटल धान व दोन लाख १७ हजार ८९७ नग बारदानाचा अपहार झाल्याची तक्रार होती. निवृत्त प्रकल्प संचालक वसंत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमण्यात आली. या समितीच्या अहवालानुसार २७कोटी ९१ लाख ५६ हजार २३२ रुपयांचा अपहार केल्याचा ठपका ठेवण्यात आला. त्या आधारे गांगुर्डे यांना सेवेतून बडतर्फ करण्यात आले आहे.गांगुर्डे यांच्यावरील आक्षेप : सातबारा उतारा नसताना धान्य खरेदी. बनावट बँक गॅरंटी घेणे. खरेदी केंद्रावर नियंत्रण न ठेवणे. मुख्यालयात उपस्थिती नसणे. अनधिकृत धान खरेदीकडे दुर्लक्ष.

# स्मार्ट अंगणवाड्या फक्त कागदावरच

## पावसाळ्यात गळक्या छिद्र पडलेल्या पत्र्यांचा निवारा; पिण्याच्या पाणी व स्वच्छतागृहांची वानवा चिमुकल्यांची परवड सुरूच

बीड। प्रतिनिधी

एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महिला व बालकल्याण विकास विभागाच्या माध्यमातून अंगणवाडी योजना राबविण्यात येते.या योजनेंतर्गत अंगणवाडीतील शुन्य ते सहा वर्षे वयोगटातील बालकांचा भौतिक, शारीरिक आणि सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करण्याचे ध्येय आहे.या मुलांना पोषणयुक्त आहार, लसीकरण, आरोग्य तपासणी, आरोग्य शिक्षण, औपचारिक शालेय शिक्षण केंद्रातुन देण्याचा प्रयत्न सुरू आहे. मात्र स्मार्ट अंगणवाडी कागदावरच राहिल्या असुन कंत्राटदार पोसण्यासाठी अनावश्यक गोष्टींवर भरमसाठ खर्च होत असतानाच मुलभूत सुविधा मलांना सुरक्षित निवारा,पिण्याचे शुद्ध पाणी, वीजपुरवठा तसेच दरवाजे, खिडक्या दुरूस्ती व स्वच्छतागृहांची वानवा असल्याचे आढळून येते. संबंधित प्रकरणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांना प्रत्यक्ष भेटून लेखी निवेदनाद्वारे मागणी केली होती. त्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला होता मात्र शासन आणि प्रशासन स्तरावर अद्याप याची अंमलबजावणी झाली नसुन प्रशासनाला याचे गांभीर्य दिसून येत नसल्याची खंत डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी व्यक्त केली.





**अंगणवाडी कामांची स्थिती**

| | पुर्ण | प्रगती | सुरू -नाही |
|---|---|---|---|
| बीड | ७५ | ७७ | ०० |
| संभाजीनगर | ०२ | २८ | २० |
| जालना | ०४ | ५४ | ०० |
| परभणी | १० | ११४ | ०० |
| हिंगोली | ०० | ०७ | ०१ |
| नांदेड | ०० | १०७ | ४४ |
| लातुर | ०४ | २२ | ०० |
| धाराशिव | ०० | ३३ | ३० |

**अखर्चित (निधी) लाखात**

| | | |
|---|---|---|
| संभाजीनगर | ५० | ५५०.७० |
| बीड | १५२ | १२१० |
| जालना | ५८ | ५३०.९७ |
| हिंगोली | ०८ | १६.९६ |
| परभणी | १२४ | ४६० |
| नांदेड | १५७ | ७११.७१ |
| लातुर | २६ | २९२.५० |
| धाराशिव | ६३ | ६८.४२ |

स्मार्ट अंगणवाडीच्या दृष्टीने अत्यावश्यक ई लर्निंग सुविधा ज्यामध्ये एलईडी टीव्ही तसेच शुद्ध पिण्याच्या पाण्याची सोय म्हणून लावण्यात आलेले वाटर प्युरीफायर अंगणवाडी मध्ये वीजपुरवठाच नसल्याने धुळखात पडुन असुन केवळ कंत्राटदार पोसण्यासाठी अंगणवाडीला एलईडी टीव्ही आणि वाटर प्युरीफायरचा पुरवठा करण्यात आला आहे का? असा संतप्त सवाल डॉ.गणेश ढवळे यांनी उपस्थित केला आहे. मराठवाड्यात ६३८ अंगणवाड्यांची कामे रखडली तर ९५ कामे वर्षं उलटुनही सुरूच नाहीत ; ३७ कोटींचा निधी मंजूर केला होता. कुपोषण मुक्तीसाठी काम करणाऱ्या ग्रामीण भागातील १३०० अंगणवाड्या स्वतःची इमारत विना उघड्यावर झाडाखाली, समाज मंदिरात, पत्र्याच्या शेडमध्ये,किरायाच्या रूममध्ये भरतात. मराठवाड्यात मागील वर्षी ६३८ अंगणवाडी ईमारती मंजुर करण्यात आल्या होत्या.या इमारतींना मंजुरी दिल्यानंतर कामाचे कार्यारंभ आदेशही देण्यात आले होते.परंतु कंत्राटदारांनी या कामांना गती दिली नाही. एक वर्षापूर्वी मंजूर झालेल्या कामांची प्रगती केवळ १४.८९ टक्के आहे अर्थातच यात ४४२ कामे सुरू झाल्याचे कागदावर दाखविले जात असुन ९५ कामे तर अद्याप सुरुच झालेली नाहीत.या कामांसाठी शासनाने ३७.९६ कोटी रूपयांचा निधी मंजूर केलेला आहे.सदरील कामे रखडली असतानाही शासन स्तरावरून याकडे गांभीर्याने पाहिले जात नाही हे विशेष.



# पसायदान प्रकल्पातील विद्यार्थ्यांना शालेय साहित्यासह केले अन्नदान

बीड। प्रतिनिधी

नेत्याच्या वाढदिवसानिमित्त अनेक कार्यकर्तांकडून अनावश्य खर्च केला जातो मात्र तसे न करता गोरगरिब अनाथ मुलांच्या मदतीला येत शालेय साहित्य वाटप करून मंत्री संजयभाऊ राठोड यांचा वाढदिवस पसायदान सेवा प्रकल्प येथील विद्यार्थ्यांमध्ये साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांसाठी वह्या,पुस्तके, पेन पेन्सील सह विविध शालेय साहित्य देण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांना अन्नदान करत ना.मंत्री संजयभाऊ राठोड यांच्या दीर्घ व निरोगी आयुष्यासाठी प्रार्थना करण्यात आली.

यावेळी कार्यक्रमाला उपसंपादक नितीन चव्हाण, पसायदान सेवा प्रकल्पाचे गोवर्धन दराडे, युवानेते सुरज चव्हाण, सरपंच महेश शिंदे, सुनिल राठोड, धिरज चव्हाण, जीवन राठोड, भाऊसाहेब चव्हाण, विशाल तांगडे, परमेश्वर राठोड, अविनाश जाधव, निखील जोगदंड यांच्यासह आदी कार्यकर्ते उपस्थित होते. जनसामान्यांच्या उपयोगी कार्यक्रम घेवून अनाथांच्या मदतीला येत वाढदिवस साजरा केल्याने नेत्यांला याबद्दल हेवा वाटावी असा कार्यक्रम सुरज चव्हाण यांच्यामार्फत घेण्यात आला.

यावेळी येथील मुलांकडून मंत्री संजयभाऊ राठोड यांना शुभेच्छा संदेश देत दिर्घ आयुष्याची प्रार्थना करण्यात आली. त्याबरोबर येथील प्रकल्पामध्ये अनेक फळ रोपे देत लागवड करण्यात आली. यावेळी प्रकल्पाचे दराडे सर यांच्याकडून आभार व्यक्त करण्यात आले.

## सामाजिक कार्यकर्त्यांच्यावतीने वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन

बीड । प्रतिनिधी

शहरातील राजीव गांधी चौक नजीक दि.१ जुलै २०२५ मंगळवार रोजी महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री व हरितक्रांतीचे प्रणेते स्व. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त सामाजिक कार्यकर्त्यांच्या वतीने वसंतराव नाईक यांच्या अर्धाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी मराठवाडा शिक्षक संघटनेचे नेते तथा मार्गदर्शक प्राचार्य डी.जी. तांदळे यांनी हरितक्रांतीचे जनक म्हणून ओळखले जाणारे वसंतराव नाईक यांनी कृषी, शिक्षक आणि सामाजिक समतेच्या क्षेत्रात दिलेल्या योगदानाचे महत्त्व आपल्या भाषणातून सामाजिक कार्यकर्त्यांना समजून सांगितले. तसेच वामा व सत्यकथा बळीराजाची ठिणगी संसाराची या चित्रपटात बीडचे भूमिपुत्र अभिनेते डॉ. महेश कुमार वनवे यांनी उत्कृष्ट अभिनय केल्याबद्दल त्यांचा सामाजिक कार्यकर्त्यांच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी मीनाक्षी देवकते. डॉ.संजय तांदळे ,एड. अनिल बारगजे, नितीन जायभाये, डी.जी. तांदळे, राजू वंजारे ,छायाताई सरोदे, अभिजीत वैद्य ,बाजीराव ढाकणे रामधन जमाले, श्रीकांत गदळे गणेश बजगुडे, लताताई राऊत, अजय वानरे आदींची उपस्थिती होती.



# बांध खोदल्याच्या कारणातून चुलत भावाचा खून

जालना। प्रतिनिधी

शेतातील बांध खोदल्याच्या रागातून चुलत भावानेच चुलत भावाची दगडाने ठेचून हत्या केल्याची घटना वाढोना ता. परतुर जि. जालना येथे घडली. याप्रकरणी बापलेकाला पोलिसांनी अटक केली आहे. किरण तनपुरे असे मयत तरुणाचे नाव आहे. तर परमेश्वर गुलाबराव तनपुरे आणि किशोर परमेश्वर तनपुरे अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहे.

परतुर तालुक्यातील वाढोणा शिवारात रविवारी सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास शेत गट क्रमांक ११९ मध्ये तक्रारदार गणेश तुळशीदास तनपुरे (६०) आणि त्याचा मयत मुलगा किरण तनपुरे (२४) काम करीत होते. यावेळी गणेश यांचा चुलत भाऊ परमेश्वर गुलाबराव तनपुरे आणि त्याचा मुलगा किशोर परमेश्वर तनपुरे तेथे आले. शेतातील सामाईक बांधावरुन पावसाचे पाणी जाण्यासाठी तक्रारदार गणेश तनपुरे यांच्या बाजूने चारी खोदली होती. याबाबत गणेश तनपुरे यांनी आरोपींना विचारणा केली असता आरोपीने शिवीगाळ करुन तक्रारदार यांना मारहाण करुन खाली पाडले. वडिलांना मारहाण होत असल्याची पाहून मयत किरण तनपुरे हा मध्यस्थीसाठी आला.

किरणने आपल्या वडिलांना मारहाण केल्याबाबत जाब विचारताच आरोपीने बांधावरील दगडाने किरण तनपुरेच्या डोक्यावर, चेहऱ्यांवर जबर मारहाण करुन त्यास जागीच ठार केले. यानंतर दोघे बापलेक घटनास्थळावरुन पसार झाले. याप्रकरणी परतूर पोलीस ठाण्यात सोमवारी सकाळी गणेश तनपुरे यांच्या तक्रारीवरुन हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी तात्काळ शोधमोहिम राबवत दोन तासात आरोपींच्या मुसक्या आवळल्या. आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली आहे. दोघांना न्यायालयात हजर करण्यात येणार आहे. ही कामगिरी जिल्हा पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल व अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपानी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

## तुकाराम भिसे यांचा जालना महानगरपालिकेच्या वतीने गौरव

जालना। प्रतिनिधी

जालना शहर महानगरपालिकेचे मुख्य लेखा अधिकारी तुकाराम भिसे यांची यवतमाळ येथे मुख्य लेखा व वित्त अधिकारी पदावर बदली झाल्याने, त्यांचा महापालिकेच्या वतीने शुक्रवारी भावपूर्ण सत्कार करण्यात आला. श्री. भिसे हे अतिशय शांत, संयमी, तत्पर आणि कर्तव्यनिष्ठ अधिकारी म्हणून परिचित असून, त्यांच्या कार्यशैलीने महापालिकेच्या आर्थिक व्यवहारात शिस्त आणि पारदर्शकता निर्माण झाली होती. त्यांच्या बदलीमुळे प्रशासनात एक मोठी पोकळी निर्माण झाल्याची भावना अतिरक्त आयुक्त सौ. प्रियांका राजपुत यांनी आपल्या भाषणात व्यक्त केली. याप्रसंगी मुख्य लेखा परीक्षक प्रविण लिंबाळकर यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. गंगाधर वानोळे यांनीही आपल्या गौरवोद्गारांमध्ये सांगितले की, ''भिसे साहेब हे केवळ अधिकारी नसून मार्गदर्शक व सहकारी भावना जपणारे व्यक्तिमत्त्व आहेत. त्यांच्या पुढील वाटचालीसाठी आम्हा सर्वांकडून शुभेच्छा.'' कार्यक्रमाचे आयोजन जालना महानगरपालिकेच्या सभागृहात करण्यात आले होते. उपस्थित सर्व अधिकारी, कर्मचारी व विविध विभाग प्रमुखांनी त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



# कृषी दिनानिमित्त मराठवाडा ऊस रोपवाटिकेचा सन्मान

बीड । प्रतिनिधी

हरित क्रांतीचे जनक वसंतराव नाईक कै वसंतराव नाईक यांच्या जन्मदिनानिमित्त व महाराष्ट्र कृषी दिनी पंचायत समिती परळी वै. व कृषी विभागच्या च्या वतीने पंचायत समिती सभागृह परळी ता.परळी वै.जि.बीड येथे श्री.सुनील केंद्रे गट विकास अधिकार पं.स.,श्री.के.आर.पौळ तालुका कृषी अधिकारी परळी वै. यांच्या प्रमुख उपस्थितीत जनाधार फार्मर प्रोड्युसर कंपनी लि. संचलित मराठवाडा ऊस रोपवाटिका व पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर भाजीपाला रोपवाटिका

गाडे पिंपळगाव ता.परळी वै.जि.बीड ला सन्मानित करण्यात आले. जनाधार फार्मर प्रोडूसर कंपनी च्या वतीने कृषी क्षेत्रासाठी केलेल्या कार्याची दखल घेऊन व नाबार्ड, कृषी विभाग, वनविभाग, यशदा पुणे, रेशीम विभाग इत्यादी च्या माध्यमातून एकध्यास सहाय्यपूर्ण कृषी विकास हा मंत्र आत्मसात करत शेतकरी व शेतीच्या विकासासाठी शेतकरी मंडळ स्थापना,शेतकरी गट स्थापना,विविध शासकीय योजना शेतकऱ्यां पर्यंत पोहोचवणे,तशेच कृषी विभागाच्या माध्येमातून भाजीपाला रोपाची नर्सरी, शेतकरी आपले सरकार सेवा केंद्र, शेतीमाला खरेदी केंद्र, मराठवाडा ऊस रोपवाटीका इत्यादी प्रकल्प व जागर ऊस शेतीचा अभियान,सेंद्रिय शेती अभियान,जलसाक्षरता,बळीराजा बचाव देश बचाव अभियान इत्यादी कृषी क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेत वसंतराव नाईक यांच्या जन्मदिनानिमित्त जनाधार फार्मर कंपनी चा सन्मान करण्यात आला.

यावेळी शेतकरी उत्पादक कंपनीच्या वतीने मुक्ताराम सोनवणे यांनी सन्मान स्वीकारला.



# कृत्रिम पावसाचा प्रयोग तात्काळ करा – राजेंद्र आमटे

बीड। प्रतिनिधी

जिल्ह्यात यावर्षी जून पेक्षा मे महिन्यातच पाऊस जास्त झाला मात्र शेतकऱ्यांनी जून महिन्यात पेरणी केली पेरणी केल्यानंतर पावसाने दडी मारली असून पिके करपू लागली आहेत आठ ते दहा दिवसात पाऊस न आल्यास दुबार पेरणीचे संकट गडद झाले असून शासनाने त्वरित कृत्रिम पावसाचा प्रयोग राबवावा अशी मागणी शिवसंग्राम शेतकरी आघाडीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र आमटे यांनी जिल्हाधिकारी यांना दिलेले निवेदनात केली आहे.

बीड जिल्हा हा दुष्काळाने वारंवार होरपळत आहे याचा फटका सर्वाधिक शेतकऱ्यांना बसत असून कधी आसमान येते कधी सुलतानी संकटाने शेतकरी मेटाकुटीला आला आहे. यावर्षी मे महिन्यातच पेरणीयोग्य पाऊस झाला होता, परंतु शेतकऱ्यांनी पेरणीची योग्य वेळ नसल्याने जून महिना पेरणीसाठी निवडला लाखो रुपयांचे खत, बी बियाणे शेतकऱ्यांनी मातीत पेरली असून पेरणीनंतर पावसाने मात्र दडी मारली आहे त्यामुळे कवळी पिके सुकू लागली आहे. अशा परिस्थितीत पावसाची नितांत गरज असून येत्या आठ ते दहा दिवसात दमदार पाऊस न झाल्यास दुबार पेरणीचे संकट अधिक गडद झाल्याचे दिसून येत आहे त्यामुळे शासनाने त्वरित उपाययोजना करून शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी कृत्रिम पावसाचा प्रयोग जिल्ह्यात राबवावा अशी मागणी शिवसंग्राम शेतकरी आघाडीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र आमटे यांनी जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात केली आहे. यावेळी राजेंद्र आमटे, तालुकाध्यक्ष पंडित माने,धर्मराज मागदे, दत्ता सुरवसे, नितीन आगाम, भीमराव कुटे, माऊली शिंदे, रविंद्र नागरगोजे, आश्रुबा नागरगोजे, समाधान जमाले, दादासाहेब सोनवणे, सह आदी शेतकरी उपस्थित होते.





जाहिर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**

दुरध्वनी क्रमांक : ०२-४८३-२७५०२६
जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-३८
दिनांक -२३/०६/२०२५

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती गणराज संतोष झिंजुर्डे रा. बळेगाव ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या स्वतः च्या जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मि ळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | गणराज संतोष झिंजुर्डे | स्वतः | १५/०३/२००७ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-२३/०६/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

स्वाक्षरित
तहसिलदार तथा कार्यकारी
दंडाधिकारी, अंबड


# समाजातील प्रत्येक घटकाला फायदा व्हावा असेच काम संस्थेने केले–जयदत्त क्षीरसागर

बीड। प्रतिनिधी

स्व.काकूंनी लावलेल्या लहान रोपट्याचे विशाल वटवृक्षात रूपांतर झाले आहे. या वृक्षाच्या छत्रछायेखाली तेव्हापासून हजारो कुटुंबांना आधार मिळाला आणि यापुढे मिळत राहील. संस्थेने सर्व जाती धर्माला प्राधान्य दिल्यामुळेच या संस्थेत गुणवंत विद्यार्थी घडले आहेत. सामाजिक बांधिलकी जोपासणारी ही संस्था समाजातील प्रत्येक घटकाला फायदा व्हावा असेच काम करत असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले. विनायक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक महादेव जाधव यांच्या सेवापूर्ती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर हे होते तर व्यासपीठावर डॉ.लक्ष्मण जाधव, हरिभाऊ गायकवाड, शिक्षणाधिकारी विक्रम सारूक, नानासाहेब काकडे, हर्षद क्षीरसागर, सुभाष क्षीरसागर, उषाताई सरवदे, विजय सरवदे, सतिष काटे, अजित जाधव, मकबूलभाई, सुधाकर मिसाळ, एम.बी.सानप, श्रीराम बहीर, मौलाना काझी महंमद, सहाय्यक प्रशासकिय अधिकारी योगेश पवार, एम.ए. राऊत, प्रकाश राठोड, किर्तीताई पांगारकर, इंजि.भाऊसाहेब देशमाने आदी मान्यवर उपस्थित होते.यावेळी बोलताना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की, गेल्या ३२ वर्षे ज्ञानदानाचे काम करून संस्थेत प्रमाणिकपणे काम करणारे एम.सी. जाधव भटक्या विमुक्त समाजात जन्मलेला एक तरूण उच्च शिक्षण घेवून उत्तम काम करू शकतो आणि सेवा करू शकतो असे लोक संस्थेला मिळाले. शिवाजी पाटोळे याने स्व.काकूंपासून सेवा केली. संस्थेने सेवेत घेताना जात-पात, धर्म कधीच बघीतला नाही, गुणवान लोकांना संधी देवून संस्थेने गुणवान विद्यार्थी घडवले. शिक्षणाच्या क्षेत्रात मोठे बदल झाले आहेत. हे बदल स्वीकारत छोट्या रोपट्याने वटवृक्षात रूपांतर केलं आहे. अनेक अडचणीवर मात करत सामाजिक बांधीलकी जोपासत संस्थेचा प्रत्येक समाज घटकाला फायदा व्हावा असा प्रयत्न राहीला. बीड जिल्हा संवेदनशील जिल्हा आहे. धार्मिक वृत्ती जोपासणात वसा आणि वारसा चालवणारा जिल्हा आहे असे त्यांनी सांगितले. याशिवाय विक्रम सारूक, लक्ष्मण जाधव, हरिभाऊ गायकवाड, महादेव जाधव यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी शेषनारायण कोळेकर, प्राचार्य विश्वास कंधारे, मुख्याध्यापक अण्णासाहेब थिटे, धनवंत मस्के, सुरेश पेशकार, व्ही.आर. शिंदे, सुधाकर तांदळे, अंगद दहिफळे, विष्णु जोगदंड, राजेंद्र कुऱ्हे, शिरीष घरत, विकास बन्सोडे, विलास येडे, आप्पासाहेब येवले, केशव भांगे, प्रशांत पवळ, किशोर उपरे, प्रदिप जगताप, अभिषेक राऊत, रावसाहेब भोसले, शहाजी तेलप, सुनिल शिंदे, रियाज बेग, सुहास अमरापूरकर, प्रफुल्ल भोज यांच्यासह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, महिला-पुरूषांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक आशा हंडिबाग यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा.श्रीराम जाधव यांनी केले शेवटी प्रा.राजेंद्र गाडेकर यांनी उपस्थितांच आभार मानले.



# शक्तिपीठ विरोधात शेतकऱ्यांची वज्रमुठ

अंबाजोगाई । प्रतिनिधी

शेतकऱ्यांना देशोधडीला लावणाऱ्या शक्तिपीठ महामार्गास शेतकऱ्यांचा कडाडून विरोध होत असून राज्य सरकारने हा प्रस्तावित महामार्ग तात्काळ रद्द करावा यासाठी राज्यातील शेतकऱ्यांसह बीड जिल्ह्यातील परळी, अंबाजोगाई तालुक्यातील प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष बाधित शेतकऱ्यांनी मंगळवार दि १ रोजी कृषिदिनी अनेक ठिकाणी रास्तारोको करून या महामार्गास तीव्र विरोध केला. अंबाजोगाई तालुक्यातील बर्दापुर, धायगुडा पिंपळा आणि परळी तालुक्यातील तळेगाव या ठिकाणी शेतकरी महिला आणि त्यांचे कुटूंबीय एकत्र येत रास्ता रोको करत शासनाचा निषेध करत





## जिल्ह्यात कृषिदिनी शेतकऱ्यांचा चक्काजाम आंदोलन

या महामार्गाला विरोध केला.

राज्यात शेतकऱ्यांना खोटी प्रलोभने व पोलीस बाळाची भीती दाखवत सीमांकन करण्याच्या प्रयत्न शासन व प्रशासन करत असून शेतकरी आता या गोष्टीला बळी न पडता शक्तीपीठ महामार्ग विरोधात एकवटला आहे. याचाच भाग म्हणून जिल्ह्यातील परळी व अंबाजोगाई तालुक्यातील ज्या गाव शिवारातून हा महामार्ग प्रस्तावित असून या महामार्गामुळे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष बाधित अबाल वृद्ध शेतकरी आणि महिला यांनी बीड जिल्हा किसान सभेच्या नेतृत्वाखाली एकत्र येत अनेक ठिकाणी रास्ता रोको केला. धायगुडा पिंपळा या ठिकाणी आंदोलन करणाऱ्या शेतकरी पुरुष महिलांना अटक करून दुपारी सोडण्यात आलं किसान सभेचे एड.अजय बुरांडे, कॉ.मुरलीधर नागरगोजे, भाई मोहन गुंड कॉ.भगवान बडे, कॉ.मदन वाघमारे

व्यंकट ढाकणे, सुशील शिंदे, मारुती इरलापल्ले, एड.जावेद पटेल, दीपक शिंदे, अरुण पाटील, पुंडलिक धायगुडे, बावणे विठ्ठल,मीनाताई डांगे, आशाबाई पवार, भानुदास मुंडे, मारुती डांगे

याच्या प्रमुख उपस्थितीत शेकडो शेतकरी या ठिकठिकाणी रास्तारोको मध्ये सहभागी झाले होते.

सरकार शेतकरी विरोधी भूमिका घेत असून शेतकऱ्यांना भूमिहीन करून देशोधडीला लावणारा शक्तीपीठ महामार्गाच्या सीमांकन आणि जमीन संपादन करण्यासाठी सरकार पोलिसी बळाचा वापर करत आहे. अधिकारी देखील शेतकऱ्यांना धमक्या देण्याचा प्रकार बीड जिल्ह्यात सुरू असून सरकारच्या ह्या सर्व दडपशाही विरोधात बीड जिल्ह्यातील शेतकरी पेटून उठला असून सत्ताधारी जर सत्तेचा आणि बळाचा गैरवापर करत असतील तर हे आंदोलन यापेक्षा अधिक तीव्र स्वरूप घेईल.

ॲड.अजय बुरांडे
किसान सभा, बीड

# पुर्विच्या डांबरी रोडवर खडी अंथरूण मुख्य बाजारपेठ रस्त्याचे काम सुरू

## रात्रीच्या अंधारात गुत्तेदारांचा बोगस कामाचा सपाटा

धारूर । प्रतिनिधी

किल्ले धारूर शहरांमध्ये व्यापारी तथा नागरिकांच्या अनेक वर्षाच्या मागणीनंतर छत्रपती शिवाजी महाराज,चौक काशिनाथ चौक, तसेच हनुमान मंदिराकडे जाणारा मुख्य रस्त्याचे काम सध्याला सुरू आहे परंतु संबंधित अधिकारी यांच्या आशीर्वादाने गुत्तेदाराने थातूरमातूर कामाचा डाव रचला आहे हे स्पष्ट दिसून येत आहे तरी शहरातले नागरिक गप्प बसले आहेत कारण धारूर शहर हे नावालाच नगरपरिषद मध्ये आहे की काय ? असा प्रश्न उपस्थित होत आहे

कारण धारूर शहर हे अनेक दिवसांपासून विकासापासून वंचित असल्यामुळे कसा का होईना वाकडा तिकडा थोडाफार विकास होत असल्यामुळे धारूर शहरातील नागरिक होत असलेल्या मुख्य बाजारपेठेतील रस्त्याचे काम बोगस कामाबद्दल खुलून बोलण्यास तयार नाहीत कारण जर शहरातल्या नागरिकांनी आवाज उठवला तर सुरू असलेले काम हे बंद पडेल त्यामुळे धारूर शहरातील नागरिक गप्प असल्याचा फायदा रस्त्याचचे गुत्तेदार घेत आहेत.

तर या कामात संबंधितअधिकारी यांच्यासमवेत बोगस काम करत असल्याचे नागरिकांमध्ये कुजबुज सुरु आहे कारण मुख्य रस्ता हे एक-दीड फूट उकरून व्यवस्थित मुरूम टाकून न दाबताच जुन्या रस्त्यालाच

टोखरल्यासारखे केले व रोलर फिरून त्यावरतीच खडी हातरून काम हे चालु केले आहे सर्वात जास्त काम हे अंधारात उरकण्याच्या गडबडीत असल्याचे स्पष्ट दिसून येत



असल्यामुळे गुत्तेदार व संबंधित अधिकारी व बांधकाम विभाग यां सगळ्यांचा गुत्तेदार सोबत संगणमताने स्वतःचा विकास चालू असल्याचे नागरिकांमध्ये चर्चेला उधाण आले आहे. ऐरवी साधी नाली बांधकाम सुरु असले तरी उभे राहून काम करून घेणारे समाजसेवकही फिरकेना झालेले दिसून येत आहे.नगरपरिषद प्रशासन विकास होत असल्याचे दृश्य दाखवते मात्र त्याच विकासानावाखाली अनेक गुत्तेदार

◀◀ पान ३ वर

# राजर्षी शाहू महाराज सामाजिक क्रांतीचे प्रणेते-ह.नी.सोनकांबळे

अंबाजोगाई । प्रतिनिधी

राजर्षी शाहू महाराज सामाजिक क्रांतीचे प्रणेते होते राजकीय क्रांतीच्या आधी सामाजिक क्रांती झाली पाहिजे ही राजर्षी शाहू महाराजांची भूमिका होती असे प्रतिपादन प्रख्यात विचारवंत डॉ . ह. नी.सोनकांबळे (संभाजीनगर ) यांनी केले. येथील योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालय, योगेश्वरी महाविद्यालय व कृष्णाजी पुरुषोत्तम चौसाळकर योगेश्वरी तंत्र निकेतन महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने राजर्षी शाहू महाराज जयंती,सामाजिक न्याय दिनाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात डॉ. ह.नी.



सोनकांबळे यांनी राजर्षी शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यावर सविस्तर प्रकाश टाकला. सामाजिक न्यायाचा सिध्दांत शाहू महाराजांनी पहिल्यांदा मांडला होता.सामाजिक समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न महाराजांनी केला होता.जातीव्यवस्था नष्ट व्हावी यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी प्रयत्न केले होते. शाहू महाराज कृतीशील सुधारक होते, सक्तीच्या मोफत शिक्षणाचा त्यांनी पुरस्कार केला होता.राजकारण म्हणजे सेवा अशी राजर्षी शाहू महाराजांची धारणा होती. डॉ.बाबासाहेब आंबेडकर राजर्षी शाहू महाराजांच्या विचारांचे पाईक होते त्यांनी राजकीय आरक्षणाचा आग्रह धरला होता भारतातील मतदार विवेकी असावेत तरच लोकशाही यशस्वी होईल सामाजिक न्यायाची संकल्पना यशस्वी होईल अशी त्यांची धारणा होती.असे प्रतिपादन डॉ.ह.नी. सोनकांबळे यांनी केले. या

◀◀ पान ३ वर

# शासकीय कापूस विक्रीसाठी शेतकऱ्यांनी तयारी करावी- सभापती जयदत्त नरवडे

माजलगाव । प्रतिनिधी

शासकीय कापुस खरेदी केंद्रावर कापुस विक्री करण्यासाठी शेतक-यांनी २०२५ - २६ या हंगामाकरीता सर्व कागदपत्रांसह तयारी करावी असे आवाहन बाजार समितीचे सभापती जयदत्त नरवडे, उपसभापती श्रीहरी मोरे, सचिव हरिभाउ सवणे यांनी केले आहे.



सन २०२५ - २६ या कापूस हंगामाकरीता शासनाच्या हमीदराप्रमाणे सि. सी.आयच्या वतीने शासकीय कापुस खरेदी ८११० रूपये एवढा निश्चीत करण्यात आला आहे. शेतक-यांनी शासकीय कापुस खरेदी केंद्रावर कापुस विक्री करण्यासाठी कापसाची ई - पिक पाहणी करणे आवश्यक आहे ,सात - बारावर कापसाची नोंद असणे आवश्यक आहे,कापुस खरेदी सर्व पेमेंट आधार लिंक असलेल्या बँक खात्यात केले जाईल,त्याकरीता बँक खात्याला आधार लिंक करणे आवश्यक आहे,त्याचबरोबर आधार कार्ड ला मोबाईल नंबर लिंक करणे

# अंगणवाडी कार्यकर्त्या उषा पंडित यांचा सेवानिवृत्तीपूर्व सत्कार

चौसाळा । प्रतिनिधी

इथूनच जवळ असलेल्यास सात्रा ता बिड येथील अंगणवाडी कार्यकर्त्या उषा पंडित (राऊत) या ३१ वर्ष अंगणवाडी कार्यकर्त्या म्हणून कार्य केले त्यानंतर त्या सेवानिवृत्त झाल्याने त्यांचा अंगणवाडी कार्यकर्त्या व मदतनीस व संघटनेच्या वतीने यांचा नुकताच जाहीर सत्कार करून त्यांना सत्कारित करण्यात आले चौसाळा येथे प्राथमिक

◀◀ पान ३ वर





## माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समिती कार्यालयामध्ये कै. वसंतराव नाईक यांची जयंती उत्साहात साजरी

माजलगाव । प्रतिनिधी

मुख्य बाजारावर फुले पिंपळगाव येथील कृषी उत्पन्न बाजार समिती कार्यालयामध्ये हरित क्रांतीचे प्रणेते कै.वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून दि.०१ जुलै मंगळवार रोजी सकाळी ११:०० वाजता कार्यालयामध्ये उत्साहात साजरी करण्यात आली यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जयदत्त नरवडे,संचालक वीरेंद्र सोळंके, प्रभाकरराव होके,कदिर पठाण, सचिव हरिभाऊ सवणे,यांच्या सर्व अधिकारी कर्मचारी बांधव उपस्थित होते.

# शासकीय आय.टी.आय. आणि एस. टी.आगाराचे खासजीकरण करू नका

## बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीचे मुख्यमंत्र्यांना निवेदन

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**शासकीय आय.टी.आय आणि एस.टी.आगाराचे खासजीकरण करू नका सदरचा प्रस्ताव तात्काळ थांबवा अशी मागणी बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना उपजिल्हाधिकारी, अंबाजोगाई यांच्या मार्फत सोमवारी दिलेल्या निवेदनातून करण्यात आली आहे.**



बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीच्या वतीने महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना सोमवार, दिनांक ३० जुन २०२५ रोजी दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, महाराष्ट्र सरकारचे मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी नुकतीच एक बैठक बोलावून शासकीय आय.टी.आय. हे खासगी कंपनीकडे दत्तक देण्याचा निर्णय केलेला आहे. याचा आम्ही जाहिर निषेध करीत आहोत. सर्वप्रथम आय.टी.आय. या शिक्षणाचा उद्देश काय आहे हे पहावे लागेल. कुशल कामगार तयार करणे व विद्यार्थ्यांना स्ववलंबी बनविणे हे आय.टी.आय.चे उद्दिष्ट असते. राज्यात शासकीय औद्योगीक प्रशिक्षण संस्था ४१९ आहेत. तर खासगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था ५८८ आहेत. या संस्थांमध्ये दरवर्षी जवळपास १ लाख ५० हजार विद्यार्थी प्रवेश घेतात आणि कुशल कामगार बनून बाहेर पडतात. आय.टी.आय मध्ये प्रवेश घेण्याचा विद्यार्थ्यांचा कल वाढलेला असून त्याचे कारण, विद्यार्थ्यांना आय.टी.आय. करीत असताना १२ वी ची परीक्षा देण्याची सवलत देण्यात आलेली आहे आणि आय.टी.आय. झाल्यास अभियांत्रिकीच्या दुसऱ्या वर्षाला थेट प्रवेश मिळण्याची सोय सुद्धा करण्यात आलेली आहे. मात्र सरकारचे म्हणणे आहे की, आय.टी.आय.ला प्रवेश घेवू इच्छिणाऱ्यांचे प्रमाण फार कमी झालेले आहे. हे साफ चूकीचे आहे. त्याचे कारण कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाकडून आय.टी.आय. मध्ये सार्वजनिक खासगी भागीदारीला प्रोत्साहन देण्यासाठी नागपूर येथे मंत्री व अधिकारी यांनी बैठक घेऊन कालबाह्य अभ्यासक्रम, जुने तंत्रज्ञान, प्रशिक्षणाच्या अभावामुळे कुशल कारागीर देण्यास शासकीय आय.टी.आय. मागे पडत आहेत. असे मत व्यक्त केलेले आहे. हे खोटे असून सरकारचे मत हे नाकर्तेणाचे लक्षण दिसत आहे. शासकीय आय.टी.आय. मध्ये शिक्षक नेमणूकीची आवश्यकता भासणार नाही. त्यामुळे महाराष्ट्रामध्ये फार मोठ्या प्रमाणात बेकारीला सामोरे जावे लागणार आहे. तसेच शासकीय आय.टी.आय. कडे आज रोजी मोठ्या प्रमाणात सरकारी जमीनी आहेत. त्या जमीनीवर खाजगी कंपन्या आपले उद्योग उभे करून सरकारची मालमत्ता कमी पैशाने हडप करू शकतात आणि वेगळी ज्यादा फीस आकारण्याची शक्यता आहे. त्यामुळे राज्य सरकारने शासकीय आय.टी.आय. हे खासगी कंपनीच्या घशात घालण्याचे पाप करू नये. तसेच दुसरा मुद्दा असा की, महाराष्ट्रातील एस.टी.आगाराच्या जागेच्या खासगीकरणाचा घाट परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी घातलेला आहे. महाराष्ट्रातील तालुक्याच्या किंवा लहान शहराच्या मध्यभागी एस.टी. आगाराच्या मालकीच्या हजारो एकर जागा आहेत. त्याला भारताचे नियंत्रक महालेखा परीक्षकांनी (कॅग) यांनी सरकारी जागांचे खासगीकरण करताना योग्य प्रकारे त्याची दखल घेतली जात नाही असे ताशेरे केले आहेत. त्या जागा उद्योगपतींना देण्यासाठीच सरकारची खटाटोप चालू आहे. एस.टी. ही गोरगरीब लोकांची जीवनवाहीनी आहे. तिला आर्थिक

## तालुका आरोग्य अधिकारी डॉ.नरेश कासट यांनी जाहिरात न देताच केली बोगस पद भरती

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयात एका अशा सेविकाच्या रिक्त झालेल्या जागेसाठी जाहिरात न देता परस्पर अर्ज घेऊन अशा सेवकाची बोगस भरती केली असून निवड झालेल्या उमेदवारांपैकी कॉलिफिकेशन ला पात्र असतानाही ज्या महिलेचे शिक्षणही बसत नसून मर्जीतल्या लोकांच्या ऐकून मनमानी करून बोगस भरती केली असून जाहिरात न देता भरती केलीच कशी अशी चर्चा उमटू लागली आहे तालुका आरोग्य अधिकारी मनमानी करीत असून याच्यावर लवकर अंकुश वरिष्ठांनी ठेवावे याची चौकशी करून कारवाई करावी जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी करावे.



माजलगाव:- लोकनेते सुंदरराव सोळंके कारखान्याचे चेअरमन विरेंद्र सोळंके यांनी नुकताच ब्राझील दौऱ्यात ऊस पिक पाहणी व कारखाना विषयक यशस्वी अभ्यास दौरा केला त्याबद्दल माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने त्यांचा सत्कार केला यावेळी सभापती जयदत्त नरवडे उपसभापती श्रीहरी मोरे संचालक तथा माजी सभापती नितीनराव नाईकनवरे, प्रभाकर होके, मनोज जगताप, आसाराम घायतीडक,डॉ उद्धव नाईकनवरे, नंदकिशोर सजगणे, अमोल जाधव, आबा भोसले, जुगलकिशोर नावंदर,भगवान आगे,कदिर खाँ पठाण व सचिव हरिभाऊ सवणे

# जिथे विषय गंभीर तिथे सुरेश आण्णांचा मावळा : नगराध्यक्ष राजू जाधव

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा शहरातील वाढते अपघात, महिला सुरक्षेचे प्रश्न, तसेच विद्यार्थी व पालकांच्या मनात असलेल्या असुरक्षिततेच्या पार्श्वभूमीवर आमदार सुरेश आण्णा धस यांच्या मार्गदर्शनाखाली पाटोदा नगरपंचायत कार्यालयात एक महत्त्वपूर्ण आणि व्यापक बैठक घेण्यात आली. या बैठकीत नगराध्यक्ष राजू भैय्या जाधव, पोलीस निरीक्षक जाधव साहेब, शिक्षण अधिकारी गांगुर्डे साहेब यांच्यासह शहरातील शाळा, कॉलेज, व क्लासेसचे प्रमुख प्रतिनिधी उपस्थित होते.या बैठकीत शहराच्या सर्वांगीण सुरक्षेसाठी खालील महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले प्रत्येक चौकात होणार सीसीटीव्ही निगराणी नगराध्यक्ष राजू भैय्या जाधव यांनी शहराच्या सुरक्षिततेसाठी महत्त्वपूर्ण घोषणा करत सांगितले,

पुढील एका महिन्याच्या आत आमदार सुरेश आण्णा धस यांच्या नेतृत्वाखाली पाटोदा शहरातील सर्व प्रमुख चौक व गर्दीची ठिकाणे येथे सीसीटीव्ही कॅमेरे बसवले जाणार आहेत. यामुळे गुन्हेगारीवर नियंत्रण येईल, तसेच प्रशासनाला देखील मदत होईल.पाटोदा पोलीस स्टेशनचे दामिनी पथक



## पाटोदा शहरात सुरक्षेच्या दृष्टीने नगरपंचायत,पोलीस प्रशासन,शैक्षणिक संस्थांची संयुक्त बैठक; विद्यार्थ्यांसह महिलांच्या सुरक्षेसाठी एकत्रित घेणार पुढाकार

होणार सक्रीय; शाळा- कॉलेजमध्ये किंवार कोड बसवण्यात येणार पोलिस निरीक्षक जाधव साहेब यांनी विद्यार्थिनी व महिलांच्या सुरक्षेसाठी पुढील पावले उचलण्याची घोषणा केली. शहरातील सर्व शाळा, कॉलेज व क्लासेसमध्ये किंवार कोड लावण्यात येणार असून विद्यार्थ्यांना कोणतीही आपत्कालीन परिस्थिती भासताच थेट पोलिसांशी संपर्क साधता येईल. यासोबतच दामिनी पथक अधिक सक्रिय करून परिसरात गस्त वाढवण्यात येईल.'' पाटोद्यातील जिल्हा परिषद शाळांमध्येही बसणार सीसीटीव्ही कॅमेरे शैक्षणिक वातावरण सुरक्षित व पारदर्शक व्हावे यासाठी शिक्षण विभागाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. शिक्षण अधिकारी गांगुर्डे साहेब म्हणाले,पाटोदा तालुक्यातील सर्व जिल्हा परिषद शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याचे नियोजन आहे. विद्यार्थ्यांची सुरक्षा, शिक्षक-विद्यार्थी संबंध यामध्ये शिस्त व पारदर्शकता येण्यासाठी हा निर्णय उपयुक्त ठरेल.'' संयुक्त समितीची स्थापना बैठकीत एक निर्णय घेण्यात आला की, नगरपंचायत, पोलीस प्रशासन, शिक्षण विभाग व शाळा-कॉलेज प्रतिनिधी यांची संयुक्त समिती स्थापन करण्यात येईल. ही समिती वेळोवेळी आढावा घेऊन सुरक्षेच्या दृष्टीने सुधारणा सुचवेल. पालक व नागरिकांचा सहभाग महत्त्वाचा या सुरक्षाविषयक उपाययोजना राबवताना शहरातील नागरिक, पालक व तरुणांनी देखील सकारात्मक सहभाग द्यावा, असे आवाहन सर्व अधिकाऱ्यांनी व नगराध्यक्ष राजू भैय्या जाधव यांनी केले आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# मास्क घालून आले, बंदूक दाखवली आणि सोनं घेऊन पसार; पुण्यातील धक्कादायक प्रकार

पुणे । प्रतिनिधी

**भरदिवसा बंदुकीच्या धाकाने वडगाव बुद्रुक येथील सराफी पेढी लुटल्याचा प्रकार समोर आला आहे. दुचाकीवर तोंडाला मास्क लावून आलेल्या तिघांनी येथील गजानन ज्वेलर्समध्ये घुसून महिलेला मारहाण करत शस्त्राच्या धाकाने पाच सोनसाखळी आणि एक नेकलेस असा पाच तोळे सोन्याचा ऐवज जबरदस्तीने हिसकावून पळ काढला.**



दरम्यान, घटनेनंतर पसार झालेले तिघे आरोपी एका चारचाकी गाडीच्या डॅश कॅमेर्यात कैद झाले असून, सिंहगड पोलीस आणि गुन्हे शाखेची पथके त्यांच्या मागावर आहेत. याप्रकरणी सिंहगड पोलीस ठाण्यात जबरी चोरी, आर्म ॲक्टसह विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याबाबत मंगल घाडगे (५५, रा. सदाशिव दांगट नगर, आंबेगाव बुद्रुक) यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार तिघांवर गुन्हा दाखल झाला आहे. मंगळवारी दुपारी दीडच्या सुमारास वडगाव, रेणुका नगरी परिसरात असलेल्या गजानन ज्वेलर्स येथे ही घटना घडली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी आणि त्यांचे पती शंकर यांनी मंगळवारी सकाळी नेहमीप्रमाणे दुकान उघडले. काही वेळानंतर फिर्यादीचे पती एका अंगठीची डिलेव्हरी ग्राहकाला देण्यासाठी दुकानाबाहेर पडले. त्यावेळी फिर्यादी या एकट्याच दुकानात होत्या.दरम्यान दीडच्या सुमारास दुचाकीवरून आलेले तिघेजण थेट दुकानात शिरले. त्यांनी तोंडाला मास्क लावले होते. तर त्यांच्याकडे पिस्तूल होते. त्यांनी काउंटरवर बसलेल्या फिर्यादी यांना मारहाण करीत धमकावले.पिस्तुलाचा धाक दाखवून महिला बसलेल्या काउंटर पाठीमागील शोकेसमधून हाताला येईल तेवढे सोने घेऊन आरोपी पसार झाले. आरोपींनी महिलेला मारहाण केली असून, त्यांच्या डोक्यात दुखापत झाली आहे. महिलेने आरडाओरड करताच नागरिकांनी दुकानाच्या आवारात गर्दी केली.तोपर्यंत आरोपींनी तेथून पळ काढला होता. नंबर प्लेट नसलेल्या काळ्या रंगाच्या दुचाकीवरून तिघे पळू जाताना दिसून येते आहेत. हा प्रकार एका चारचाकी गाडीच्या डॅश कॅमेर्यात कैद झाल आहे. तिघांनी आपले चेहरे झाकले असून, पाठीमागे बसलेल्या एक व्यक्ती पिस्तूल दाखवत दहशत निर्माण करत असल्याचे दिसून येते आहे.

या घटनेची माहिती मिळताच परिमंडळ तीनचे पोलीस उपायुक्त संभाजी कदम, सिंहगड पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिलीप दाईंगडे, गुन्हे निरीक्षक उत्तम भजनावळे यांनी घटनास्थळी धाव घेतली.

# महानगरपालिकेच्या गेटवर तिरडी उठाव आंदोलन

पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी

आंदोलनाचे आयोजक भाजपा महायुतीचे घटक पक्ष असणाऱ्या रिफायन आठवले गटाचे महाराष्ट्र राज्य व्यापारी आघाडीचे उपाध्यक्ष दत्तात्रय गायकवाड यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या गेटवर तिरडी उठाव आंदोलन केले माध्यमांशी बोलताना अतिक्रमण विभागामुळे त्यांच्या भ्रष्ट कारवाईमुळे जाणून-बुजून द्वेषा पोटी केलेल्या कारवाईमुळे धनदांडग्यांना मदत करण्याच्या उद्दिष्टाने केलेल्या कारवाईमुळे माझी जगण्याची आशा संपली आहे कारण माझे रोजी रोटी ज्या धंद्यावरती अवलंबून होती ती ती टपरी महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागाने कारवाई करून घेऊन गेले या आंदोलनामधून चुकीच्या कारवाईतून ओढलेली परिस्थिती माझ्या परिवारांना महानगरपालिकेसारख्या शहरांमध्ये हलाखीचे दिवस आले आहेत त्यामुळे खचलेला एक नागरिक त्याची झालेली अवस्था ही आंदोलनाद्वारे शहरांमध्ये महानगरपालिकेला दाखवत आहे खरंच जनसामान्यांवर स्मरणाची वेळ आलेली आहे पिंपरी चिंचवड मनपा अधिकारी यांना आपल्या कायद्याची जाण नाही कोर्टाची जाण नाही कारण दिनांक २८ मार्च २०२५ रोजी पासून मी महानगरपालिकेमध्ये प्रत्यक्ष फोन द्वारे किंवा पत्रव्यवहाराद्वारे महापालिकेकडे न्याय मागत आहे परंतु मला न्याय न भेटता उडवा उडवीचे उत्तरे दिली गेली माझ्याकडे महापालिकेचे लायसन्स असून सुद्धा हातगाडी उचलून नेली असून मी माझ्या टपरी वरती दोन्ही प्रति लावल्या होत्या तरीसुद्धा ब प्रभाग अतिक्रमण विभागाने माझ्या रोजी रोटीवर अतिक्रमण बळाचा वापर करून



माझ्यावर कारवाई केली ही कारवाई चुकीची असल्यामुळे मी माझ्या कुटुंबावर मरणाची वेळ आली असल्यामुळे मी या अतिरिक्त उपायुक्त अधिकारी कर्मचाऱ्यांची तिरडी उठाव आंदोलन करुन निषेध करतो आहे

मला न्याय मिळावा जनसामान्यांना सुद्धा महानगरपालिकेमध्ये न्याय मिळावा असे दत्तात्रय गायकवाड यांनी दैनिक राज्य लोकतंत्रशी असे बोलताना सांगितले

# महापालिकेच्या अभियंता भरतीसाठी जागा वाढल्या; ११३ ऐवजी १७१ जागांना मंजुरी

पुणे । प्रतिनिधी

**गेल्या दीड वर्षांपासून रखडलेली महापालिकेच्या कनिष्ठ अभियंता पदांची भरती प्रक्रिया अखेर मार्गी लागण्याची शक्यता आहे. राज्य शासनाच्या नगरविकास विभागाने या भरतीसाठी आता ११३ ऐवजी १७१ जागांना मंजुरी दिली आहे. या भरतीसाठी जानेवारी २०२४ मध्ये अर्ज केलेल्या २७ हजार ८७९ उमेदवारांचे अर्जही वैध धरले जाणार आहेत.**



सुरवातीला महापालिकेने जानेवारी २०२४ मध्ये कनिष्ठ अभियंता पदांच्या ११३ जागांसाठी भरती जाहिरात प्रसिद्ध केली होती. मात्र, त्यावेळी सामाजिक आणि शैक्षणिक मागासवर्गीय उमेदवारांसाठी आरक्षणाची तरतूद न केल्यामुळे शासनाने ही प्रक्रिया थांबवून बिंदू नियमावली अद्ययावत करण्याचे निर्देश दिले होते.

महापालिकेने त्यानुसार सुधारित नियमावलीनुसार नव्याने आरक्षण समाविष्ट करून जाहिरात प्रसिद्ध करण्याची तयारी केली. मात्र, या प्रक्रियेत दीड वर्षाचा विलंब झाला आणि अर्ज केलेल्या हजारो उमेदवारांचे भवितव्य अधांतरी राहिले होते.

या पार्श्वभूमीवर महापालिकेने नगरविकास विभागाकडे मार्गदर्शन मागितले होते. त्यावर विभागाने नव्याने १७१ पदांसाठी जाहिरात प्रसिद्ध करावी आणि आधी अर्ज केलेल्या उमेदवारांचे अर्ज कायम ठेवावेत, असा स्पष्ट अभिप्राय दिला आहे.

## एज बारचा धोका नाही

नगरविकास विभागाच्या आदेशानुसार, जानेवारी २०२४ मध्ये अर्ज केलेल्या उमेदवारांना त्यांच्या जातीचा प्रवर्ग सुधारणेची संधी दिली जाणार आहे. तसेच, दीड वर्षाच्या कालावधीत वयोमर्यादा पार केलेल्या उमेदवारांनाही नव्या जाहिरातीत अर्ज करण्याची मुभा देण्यात आली आहे. त्यामुळे जुने अर्जदार देखील या भरती प्रक्रियेत सहभागी होऊ शकणार आहेत.

# सोलापूर जिल्ह्यात संत तुकाराम महाराज पालखीचे आगमन; जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते पादुकांचे पूजन

अकलूज । प्रतिनिधी

जगद्गुरू संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याने पुणे जिल्ह्यातील सराटी येथून सोलापूर जिल्ह्यात प्रवेश केला. सोलापूर जिल्हा प्रशासन प्रमुख जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी मोठ्या उत्साहाने व आनंदाने पालखीचे स्वागत केले व दर्शन घेतले.



'चला पंढरीसी जावू, बाप रखुमा देविवरा पाहू, ज्ञानेश्वर माऊली तुकाराम, जय जय रामकृष्ण हरी' असा हरी नामाचा गजर करत सर्व वारकरी भक्तिरसात न्हाऊन निघाले. जिल्हा प्रवेशानंतर अकलूज येथील सदाशिवराव माने विद्यालयाच्या प्रांगणात वारकरी भाविकांच्या डोळ्यांचे पारणे फेडणारे नेत्रदीपक असे गोल रिंगण झाले.

जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या पालखी स्वागतासाठी खासदार धैर्यशील मोहिते पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.प्रकाश महानवर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ संतोष नवले, उपविभागीय अधिकारी अमित माळी यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

हाती पताका, मुखात अखंड हरी नामाचा गजर आणि विठ्ठलाच्या दर्शनाची आस घेऊन भक्तिमय वातावरणात आले. आपल्या लाडक्या विठ्ठलाचे रूप पाहण्यास व त्याच्या पायाचे दर्शन घेण्यासाठी पालखी सोहळ्यातील वारकरी पंढरीच्या वाटेवर लगबगीने चालत आहेत. जणू हा भक्तीचा सागरच आहे. नीरा नदी ओलांडून संत तुकाराम महाराजांच्या पालखीचे सकाळी साडे आठच्या सुमारास माळशिरस तालुक्यातील अकलूज येथे आगमन झाले. यावेळी पालखी रथावर पुष्पवृष्टी करण्यात आली तर पोलिस विभागाच्या बँड पथकानेही पालखीचे स्वागत केले.

तसेच यावेळी संत तुकाराम महाराजांच्या अश्व आणि पादुकाचे पूजन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. पालखी स्वागतापूर्वी पुणे जिल्हा प्रशासनाच्या वतीने जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळ्यास भावपूर्ण निरोप देण्यात आला. तसेच पुणे जिल्हा प्रशासनाकडून सोलापूर जिल्हा प्रशासनाकडे पालखीची भक्तीभावाने देवाण-घेवाण करण्यात आली.

# मुलाचा खून करणाऱ्या वडिलांना जन्मठेपेची शिक्षा

पुणे - कौटुंबिक वादातून कुऱ्हाड डोक्यात घालून मुलाचा खून करणाऱ्या वडिलांना न्यायालयाने जन्मठेप आणि एक हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. अतिरिक्त सत्र न्यायाधीश ए. आय. पेरमपल्ली यांनी हा निकाल दिला.

शरथ चिमाजी जमदाडे (वय ६५, रा. माळवाडी वीर, ता. पुरंदर) असे जन्मठेप झालेल्या वडिलांचे नाव आहे. गणेश (वय ३२) याच्या खून झाला होता. या प्रकरणी गणेश यांचा चुलत भाऊ योगेश जमदाडे याने सासवड पोलिसात फिर्याद दिली आहे. सरकारी पक्षातर्फे अतिरिक्त सरकारी वकील प्रदीप गेहलोत यांनी या खटल्याचे काम पाहिले.

त्यांना जिल्हा न्यायालय पैरवी अधिकारी पोलिस निरीक्षक संतोष घोळवे, सत्र न्यायालय पैरवी अंमलदार पोलिस उपनिरीक्षक विद्याधर निचित, न्यायालय पैरवी अंमलदार सहायक पोलिस उपनिरीक्षक जयसिंग जाधव यांनी न्यायालयीन कामकाजासाठी मदत केली.



१५ जानेवारी २०१९ ला गणेश यांच्या राहत्या घरात हा खून झाला झाला होता. दशरथ याने मुलाच्या डोक्यात, डाव्या कानावर कुऱ्हाडीने वार करून त्याचा खून केल्याचे फिर्यादीत नमूद आहे. या प्रकरणी सासवड पोलिसांनी तपास करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले होते.

# हिंजवडी आयटी पार्कमधील नैसर्गिक ओढे-नाले बुजवणाऱ्यांवर गुन्हे दाखल होणार; पुणे पीएमआरडीएची घोषणा

पुणे : शरद पवारांचं ड्रीम प्रोजेक्ट असणाऱ्या हिंजवडी आयटी पार्कचं वॉटर पार्क नेमकं कोणामुळं झालं? किंबहुना, पवार कुटुंबाचं राजकारण त्यासाठी कारणीभूत आहे का? असा सवाल आता विचरला जाऊ लागला आहे. कारण खासदार सुप्रिया सुळेंच्या मतदारसंघाचा भाग असलेल्या हिंजवडीचा कारभार पालकमंत्री म्हणून अजित पवार पाहतात. असं असताना जगाच्या नकाशावर आयटी पार्क म्हणून ओळखल्या जाणाऱ्या हिंजवडीला वॉटर पार्क अशी ओळख निर्माण झाली, त्यामुळं चहुबाजूंनी टीका झाली. त्यानंतर जागे झालेली पुणे पीएमआरडीए रस्त्यावर उतरली आहे. नैसर्गिक



ओढे-नाले बुजवणाऱ्यांवर आता गुन्हे दाखल केले जाणारेत. अशी घोषणा पीएमआरडीए महानगरचे आयुक्त योगेश म्हसे यांनी केली.

पुणे मेट्रो, ग्रामपंचायत आणि काही कंपन्यांनी नैसर्गिक ओढे-नाले बुजवल्याचं समोर आलंय. त्यांना ओढे-नाले खुले करण्याची मुदत संपलेली आहे. उद्यापासून (२ जुलै) मात्र थेट गुन्हे दाखल करायला सुरुवात होणार. असं पीएमआरडीए महानगरचे आयुक्त योगेश म्हसे यांनी जाहीर केलंय. विशेष म्हणजे पुण्याच्या याच आयटी पार्कमध्ये तब्बल ४ ते ५ लाख कर्मचाऱ्यांसह त्यांच्यावर विसंबून इतरही रोजगार आहेत. त्यामुळे, सरकार, प्रशासन या करदात्या नागरिकांची, नोकरदारांची काळजी घेणार आहे का? हिंजवडीची होऊ घातलेली नवी ओळख पुसण्यासाठी पुढाकार घेणार आहे का? असा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होत आहे.

हिंजवडीची खड्ड पार्कची होऊ घातलेली नवी ओळख पुसली जाणार का?

जगाच्या नकाशावर आयटी पार्क म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुण्यातील हिंजवडीला आता वॉटर पार्क म्हणून नवीन ओळख मिळाली आहे. मात्र, ही अशी नको ती ओळख निर्माण करुन देण्याला प्रशासनच जबाबदार आहे. त्यांच्या भोंगळ कारभरामुळेच काही मिनिटांच्या पावसात हिंजवडी बुडून जात आहे. त्यामुळं इथं वाहन रस्त्यावरून धावतात की पाण्यातून वाहतात, असा प्रश्न सर्वसामान्यांसह आयटीईन्सना ही पडतो.या आयटी कंपन्यांमुळं सरकारला भरमसाठ करही मिळतोय. पण त्याचं आयटी पार्कचं आपलं प्रशासन असं वॉटर पार्क करु पाहतंय हे दुर्दैवी आणि अनाकलयीन आहे. ही परिस्थिती वेळीचं हाताळली नाही तर भविष्यात इथल्या कंपन्या स्थलांतरित होतील अन् भावी पिढीचं उज्वल भविष्य पाण्यात घालण्यात आपणचं जबाबदार असू, हे सांगायला कोणा ज्योतिषाची गरज नक्कीच भासणार नाही.

# वाहतूक शाखेच्या उपायुक्तपदी हिंमत जाधव; बदलून आलेल्या उपायुक्तांना नवीन जबाबदाऱ्या

पुणे । प्रतिनिधी

**पुणे शहर पोलीस दलात नव्याने बदलून आलेल्या पोलीस उपायुक्तांना अंतर्गत नियुक्त्या देण्यात आल्या आहेत. तर, सध्या आयुक्तालयात कार्यरत तीन उपायुक्तांच्या अंतर्गत बदल्या करण्यात आल्या असून, वाहतूक शाखेच्या उपायुक्तपदी हिम्मत जाधव यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी याबाबतचे आदेश दिले आहेत.**

मिलींद मोहिते यांची विशेष शाखा, पुणे शहर येथून पोलीस उप आयुक्त, परिमंडळ दोन या पदावर बदली झाली आहे. त्यांच्या जागेवर डॉ. संदीप भाजीभाकरे यांची विशेष शाखेच्या पोलीस उपायुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे. यापूर्वी भाजीभाकरे मुख्यालयाच्या उपायुक्त पदावर कार्यरत होते. दरम्यान, हिम्मत जाधव यांची परिमंडळ चार येथून वाहतूक शाखेच्या उपायुक्तपदी बदली झाली आहे.

त्यांच्या जागी छत्रपती संभाजीनगर येथून शहरात बदलून आलेले सोमय मुंडे यांची परिमंडळ चार येथे नियुक्ती करण्यात आली आहे. तर, सिंधुदुर्ग येथून बदलून आलेले कृषिकेश रावले यांची परिमंडळ एकचे उपायुक्त म्हणून आणि रा.रा. पोलीस बल समादेशक दौंड येथून बदलून आलेल्या राजलक्ष्मी शिवणकर यांची मुख्यालय उपायुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. एकूणच सहा पोलीस उपायुक्तांना वेगवेगळ्या ठिकाणी नियुक्त्या देण्यात आल्या आहेत.

# कार्बन वायूच्या उत्सर्जनामुळे समुद्रकिनाऱ्यावरची १७ मीटर जागा पाण्याखाली; पुण्यात तज्ज्ञांनी व्यक्त केली भीती

पुणे । प्रतिनिधी

जागतिक स्तरावर शहरे हवामानबदलाच्या केंद्रस्थानी असून, त्यांचे सर्वाधिक कार्बन उत्सर्जन इमारतींमधून होते. याचा नागरिकांवर आणि पर्यायाने पर्यावरणावर नकारात्मक परिणाम होतो. तो कमी करण्यासाठी राज्य हवामान कृती आराखड्याच्या माध्यमातून 'स्टेट कूलिंग ॲक्शन प्लॅन'ची अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे. यामुळे कार्बन उत्सर्जन कमी होऊन पर्यावरणावर सकारात्मक परिणाम होईल, असा आशावाद महाराष्ट्र शासनाच्या राज्य हवामान कृती कक्षाचे संचालक डॉ. अभिजित घोरपडे यांनी व्यक्त केला.

भवताल फाउंडेशन आणि मायक्रो इनोटेक यांच्यातर्फे 'हवामानबदलाचे आव्हान पेलायचे कसे?' या विषयावर सहाव्या 'भवताल टॉक'चे आयोजन रविवारी (दि. २९ जून) केले होते. या परिसंवाद डॉ. अभिजित घोरपडे बोलत होते. या वेळी वरिष्ठ हवामानशास्त्रज्ञ डॉ. रॉक्सी मॅथ्यू कोल, दुसरे हवामानशास्त्रज्ञ डॉ. विनीत कुमार सिंग, भवताल फाउंडेशनचे संस्थापक संचालक अभिजित



घोरपडे, देवानंद लोंढे, मायक्रो इनोटेकचे राजेश पवार उपस्थित होते.

डॉ. कोल म्हणाले, कार्बन वायूंच्या उत्सर्जनाचा वेग झपाट्याने वाढत आहे. यामुळे समुद्राचे तापमान देखील झपाट्याने वाढत आहे. परिणामी, पावसाचा पॅटर्न बदलत असून, अनियमित आणि अनियंत्रित पाऊस पडत आहे. परिणामी, शेतीच्या नुकसानीचे मोठे आव्हान सर्वांसमोर आहे. समुद्रपातळी प्रत्येक दशकाला तीन सेंटिमीटरने वाढल्याने प्रतिदशक समुद्रकिनार्यालगतची १७ मीटर जमीन पाण्याखाली जात आहे. समुद्र आता घरांच्या उंबरठ्यावर येऊन ठेपला आहे. यावर नियंत्रणासाठी कठोर आणि दीर्घकालीन उपाययोजनांची गरज आहे.

**२० वर्षांत चक्रीवादळात ५० टक्क्यांनी वाढ**

डॉ. विनीत सिंह म्हणाले, तापमानवाढीमुळे चक्रीवादळांच्या संख्येत मोठी वाढ झाली आहे. तुलनेने शांत असलेल्या अरबी समुद्रातील वादळांची संख्या आणि त्यांचा वेग वाढत आहे. गेल्या २० वर्षांत चक्रीवादळांची संख्या ५० टक्क्यांनी वाढली असून, वेग ताशी १५० कि. मी. इतका झाला आहे. वादळे कधी तीव्र होतात, तर कधी लवकर निष्क्रिय होतात. वादळाने उग्र रूप धारण केल्यावर पुढील १२ तासांचा अंदाज देण्यासाठीची यंत्रणा अधिक प्रभावी करणे गरजेचे आहे.

# शालेय बसमालकांच्या संपाला पुण्यातील संघटनांचा पाठिंबा

कात्रज । प्रतिनिधी

वाहतूक पोलिसांकडून शालेय बसचालकांवर होणाऱ्या ई-चलन कारवाईला विरोध करण्यासाठी महाराष्ट्रातील शालेय बसमालकांनी दोन जुलैपासून बेमुदत संप पुकारण्याचा निर्णय घेतला आहे. या संपाला पुण्यातील बसमालक संघटनांनी पाठिंबा दिला आहे.

शालेय विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या बसेस, कंपनी कामगार बस, पॅकेज टूरसाठी चालणाऱ्या गाड्यांचे मालक संघटना या संपात सहभागी होणार असल्याचे पुणे बस अँड कार्स असोशिएशनचे सचिव तुषार जगताप यांनी सांगितले.

ऑल इंडिया मोटर ट्रान्सपोर्ट काँग्रेस तसेच वाहतूकदार बचाव समिती यांच्यामार्फत बुधवारपासून (ता. २) स्वच्छेने बंदला पाठिंबा देण्यात आला आहे. त्यामुळे बुधवारपासून प्रवाशांची वाहतूक करण्यात येणार नाही. बंदला पुणे बस अँड कार्स ओनर्स असोसिएशनने संपूर्ण पाठिंबा दिला आहे.मात्र, शाळेच्या किंवा संघटनेव्यतिरिक्त बसेस, रिक्षा यांना कोणतीही अडचण नसल्याचे संघटनेकडून स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे नवीन शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच विद्यार्थ्यांना फटका बसण्याची शक्यता आहे. पुणे रिक्षा फेडरेशनचे बापू भावे यांनी आम्ही या संपात सहभागी होणार नसून आमची वाहतूक सुरळित चालू राहणार असल्याचे सांगितल्याने काही प्रमाणात प्रवाशी आणि विद्यार्थ्यांना दिलासा मिळणार आहे.